# का बसतात काँग्रेसला सतत धक्के?

**काँग्रेस निवडणुकीत जिंकतं आणि आमदार सांभाळण्यात हरतं, असा गेल्या काही वर्षांचा अनुभव आहे. भाजप निवडणुकीत हरतो आणि आमदार जमवण्यात यशस्वी होतो, हे ही वारंवार सिद्ध झालं. गेल्या वर्षी कर्नाटक हे मोठं राज्य भाजपच्या ताब्यात आल्यानंतर ज्योतिरादित्य सिंदिया यांच्या रुपाने महत्वाचा मोहरा टिपत भाजपने आता मध्य प्रदेशवरही कब्जा केला आहे. काँग्रेस यातून कोणत धडा घेणार?**



दृष्टिक्षेप
**शिवाजी कराळे,** विधिज्ञ

बरोबर दोन वर्षांपूर्वीचं चित्र डोळ्यासमोर आणा. भारतीय जनता पक्षाच्या ताब्यात २२ हून अधिक राज्यं होती. देश काँग्रेसमुक्त करण्याच्या दिशेनं जणू भाजपची वाटचाल सुरु होती. पंजाबच्या निवडणुकीपासून चित्र थोडं बदललं. पंजाब काँग्रेसच्या ताब्यात आलं. कर्नाटकमध्ये भाजपला सत्तेपासून दूर ठेवलं गेलं. गुजरातमध्ये काँग्रेसनं चांगली मुसंडी मारली. मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड ही राज्यं भाजपच्या ताब्यातून खेचून घेतली. त्यानंतर झारखंड, महाराष्ट्रही भाजपच्या ताब्यातून काढून घेतलं. असं असलं, तरी भाजपनं हार पत्करली नव्हती. अरुणाचल प्रदेश, मणिपूर, गोवा या राज्यांमध्ये निवडून आलेल्या आमदारांची संख्या कमी असली, तरी भाजपनं तिथे सत्ता मिळवली. गोव्यात महाराष्ट्र गोमंतक पक्ष विलीन करून घेतला. बहुमत पाठिशी असताना आता आणखी आमदारांची गरज काय, असा विचार भाजपनं केला नाही. गोव्यात काँग्रेसच्या विरोधी पक्षनेत्यासह इतर आमदारांना पक्षांतर करून सामील करून घेतलं. महाराष्ट्रात विरोधी पक्षनेत्याला भाजपमध्ये आणलं.

कर्नाटकमध्ये सत्ता गेल्याचं दुःख भाजपला स्वस्थ बसू देत नव्हतं. काँग्रेसमधली अंतर्गत धूसफूस, काँग्रेस आणि धर्मनिरपेक्ष जनता दलअंतर्गत वाद आणि डावलल्या गेलेल्या आमदारांची सत्ताधारी पक्षांविरोधातली नाराजी कॅश करण्याचा प्रयत्न भाजपनं सातत्यानं चालू ठेवला. काही वेळा त्यांच्या प्रयत्नांना मर्यादा आल्या, अपयश आलं. भाजपला यश मिळत नसल्यानं काँग्रेस आणि धर्मनिरपेक्ष जनता दल स्वस्थ बसलं. या दोन्ही पक्षांनी नाराज आमदारांची फिकीर केली नाही. त्यांनाच हाताशी धरून भाजपने तब्बल दोन वर्षानंतर कर्नाटकमध्ये 'ऑपरेशन कमल' यशस्वी केलं. मध्य प्रदेशमध्ये तर तेवढी प्रतीक्षा करण्याचीही गरज भाजपला भासली नाही. भारतीय जनता पक्षोपक्षा आठ आमदार जास्त निवडून आल्यानंतर काही अपक्ष, समाजवादी पक्ष, बहुजन समाज पक्षाच्या आमदारांना बरोबर घेऊन काँग्रेसनं भाजपला सत्तेपासून दूर ठेवलं. भाजपनं आणलेल्या अविश्वास ठरावाच्या वेळी भाजपच्याच दोन आमदारांना नादी लावून मुख्यमंत्री कमलनाथ 'जितं मया'च्या भूमिकेत राहिले; परंतु खुर्चीखाली सुरुंगाची पेटवलेली वात आहे आणि ती धुमसत आहे, याचं भान ना त्यांना राहिलं ना काँग्रेसला. निवडणुकीत केवळ जास्त जागा निवडून आणून चालत नाही, तर सत्ता आणून टिकवावी लागते. याचं भान काँग्रेसला जसं कर्नाटकमध्ये राहिलं नाही, तसंच मध्य प्रदेशमध्येही राहिलं नाही. त्यामुळे तर समोरुन संधी घेऊन आलेल्या ज्योतिरादित्य शिंदेंच्या सहकार्याने भारतीय जनता पक्षाने काँग्रेसचे २२ आमदारताअपल्या गोटात सामिल करुन घेतले. जनमानसात चांगली प्रतिमा असलेल्या शिंदे यांच्यासारख्या नेत्याला डावलल्याची किंमत काँग्रेसला एक राज्य गमावून मोजावी लागली.



सत्तेचं विकेंद्रीकरण करावं लागतं, सर्व गटा-तटांना सत्तेत सहभाग द्यावा लागतो, याचा विसर काँग्रेसला दोन्ही राज्यांमध्ये पडला. निवडून आलेले आमदार पुन्हा निवडणूक घेण्यास किंवा लगेच निवडणूक लढवण्यास तयार नसतात. असं असताना कर्नाटकमध्ये १३ तर मध्य प्रदेशमध्ये २२ आमदार राजीनामे देऊन पोटनिवडणूक लढण्याचं धाडस करतात, हे केवळ पदासाठी नाही तर कुणाला तरी धडा शिकवण्याच्या इर्ष्येतून. ही बाब काँग्रेसच्या नेत्यांच्या लक्षात आली नाही. देशातली सत्ता गेली, वाताहात झाली. राज्यामागून राज्यं हातातून चालली तरी काँग्रेसमध्ये गटबाजी थांबायला तयार नाही. आपल्या जवळच्या नेत्यांवर अन्याय होऊनही राहुल गांधी मदतीला येऊ शकत नाहीत. गटबाजी, पाय ओढण्यात अस्तित्त्व धोक्यात आलं तरी काँग्रेसजनांना शहाणपण येत नाही. मध्य प्रदेश काँग्रेसमध्ये कमलनाथ, दिग्विजयसिंह आणि ज्योतिरादित्य शिंदे असे तीन गट होते. विधानसभेच्या निवडणुकीत या तीनही गटांनी एकत्रित काम केल्याने काँग्रेसकडे सत्ता आली; परंतु नंतर घडलेलं महाभारत सर्वांसमोर आहे. राजस्थानमध्ये प्रमुख युवा नेता असलेल्या सचिन पायलटना मुख्यमंत्रिपदापासून दूर ठेवलं, तरी उपमुख्यमंत्रिपद देण्यात आलं. ज्योतिरादित्य यांना मात्र कोणतंही पद मिळणार नाही, याची व्यवस्था कमलनाथ आणि दिग्विजय सिंह यांनी केली. लोकसभेच्या निवडणुकीत त्यांचा ठरवून पराभव करण्यात आला. त्यानंतरही प्रदेशाध्यक्षपद मिळावं, ही शिंदे समर्थकांची अपेक्षा पूर्ण केली गेली नाही. समर्थकांना मंत्रिपद देण्याचा आग्रह डावलण्यात आला.

कमलनाथ हे मुख्यमंत्रिपद आणि प्रदेशाध्यक्षपद अडवून बसले होते. गेल्या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीतल्या पराभवानंतर राहुल गांधी यांनी काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. तेव्हापासून पक्षातली बेदिली, गटबाजी कुणी मिटवायची हा प्रश्न आहे. असं झाल्याने दोन राज्यं ताब्यातून गेली, तरी काँग्रेस सुधारायला तयार नाही. आपल्याला डावललं जात असल्याचं शिंदे यांनी सहा महिन्यांपूर्वीच आपल्या बॅनरवरील काँग्रेसचं चिन्ह हटवून स्पष्ट केलं होतं; परंतु काँग्रेसजनांनी त्याकडेही दुर्लक्ष केलं. काही मिळवायचं असेल, तर काही त्याग करावा लागतो, असं म्हणतात. आता त्याऐवजी सत्ता राखायची असेल तर पदांचा त्याग करावा लागतो, असं म्हणणं जास्त संयुक्तिक ठरेल. कमलनाथ आणि दिग्विजय सिंह या दुकलीला नेमकं तेच सुचलं नाही. मध्य प्रदेशमध्ये शिंदे यांना प्रदेशाध्यक्षपद दिलं गेलं असतं, तरी मध्य प्रदेशची सत्ता हातून गेली नसती. भारतीय जनता पक्षावर टीका करून आपल्या चुकांवर पांघरूण घालणं सोपं असलं, तरी आपल्या चुकांमुळेच भारतीय जनता पक्षाला पाय पसरायला संधी मिळाली, हे काँग्रेसच्या ध्यानी येईल, तो सुदिन.

काँग्रेसमधल्या सुंदोपसुंदीचा भाजपनं अचूक फायदा उठवला. राज्यसभेची उमेदवारी, मंत्रिपदाचं आश्वासन आणि समर्थक आमदारांना निवडून आणण्याची हमी दिल्यानं ज्योतिरादित्य शिंदे भाजपच्या गळाला लागले. त्यासाठी भाजपला फार काही करावं लागलं नाही. फक्त राज्यपाल लालजी टंडन यांना हाताशी धरून बहुमत चाचणी लवकर घेण्याचा प्रयत्न भाजपनं केला.

या पार्श्वभूमीवर राज्यपालांच्या अधिकारांना आव्हान देत आणि सभापतींना हाताशी धरून गेलेल्या आमदारांपैकी काहींना परत आणता येतं का, हा प्रयत्न कमलनाथ आणि दिग्विजय सिंह यांनी करून पाहिला. त्यासाठी दिग्विजय सिंह स्वतः बंगळुरुला गेले; परंतु काँग्रेस सोडण्याची पुरेपूर मानसिकता तयार करणाऱ्या २२ आमदारांनी थेट दिग्विजय सिंह यांच्यामुळेच ही वेळ आल्याचा आरोप केला. त्यांना भेटायलाही नकार दिला. कोरोनाची भीती दाखवून घोडेबाजार करण्याच्या काँग्रेसच्या प्रयत्नांना माजी मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं. सर्वोच्च न्यायालयातल्या सुनावणीच्या वेळी आमदारांना डांबून ठेवणं जसं चुकीचं आहे, तसंच आमदारांचे राजीनामे न स्वीकारणं आणि बहुमत चाचणी लांबणीवर टाकणं हे कसं चुकीचं आहे, हे ही सर्वोच्च न्यायालयानं अधोरेखित केलं. राज्यपालांनी दिलेला 'आजच बहुमत सिद्ध करा' हा आदेश घटनाबाह्य असल्याचं मुख्यमंत्री कमलनाथ यांनी म्हटलं होतं. खरं तर बहुमत आपल्या पाठिशी नाही, हे कर्नाटकमध्ये बी. एस. येडियुरप्पा यांना निवडणुकीनंतर माहिती होतं. तरी त्यांनी राज्यपालांना हाताशी धरून महिनाभरात विश्वासदर्शक ठराव मंजूर करून घेण्याचं जाहीर केलं; परंतु सर्वोच्च न्यायालयानं त्यांना तातडीनं बहुमत सिद्ध करण्याचा आदेश दिला. त्यानंतर मात्र विश्वासदर्शक ठरावाला सामोरं जाण्याऐवजी त्यांनी थेट राज्यपालांकडे जाऊन राजीनामा दिला होता. तीच वेळ कमलनाथ यांच्यावर आली.

२२ आमदारांचं पक्षांतर आणि राजीनामे तसंच दोन आमदारांचं निधन यामुळे विधानसभेत २०६ च आमदार राहिले. विश्वासदर्शक ठराव संमत होण्यासाठी १०४ आमदारांची गरज आहे. भाजपकडे १०७ आमदार आहेत. त्यामुळे भाजपचं सरकार सहज येऊ शकतं, याची उशिरा का होईना जाणीव झाल्यानं कमलनाथ यांना राजीनामा द्यावा लागला. परिणामी, निवडणुकीत जिंकलं आणि आमदार सांभाळता न आल्यानं घालवलं, अशी मध्य प्रदेश काँग्रेसची स्थिती झाली. परिणामी, काँग्रेसच्या हातून एका वर्षात दोन मोठी राज्यं गेली.

---

# मारेकरी संपले, आव्हान कायम

**अखेर निर्भयाचे मारेकरी काळाच्या उदरात गडप झाले. न्यायाचं एक वर्तुळ पूर्ण झालं. पण खरा प्रवास आता सुरु होत आहे. आजच्या महिला स्वयंसिद्धा आहेत. समाजाच्या जडणघडणीतही त्यांचा महत्त्वाचा वाटा राहिलेला आहे. अनेकजणी तर सीमेवर देशाचं रक्षण करत आहेत. निर्भयाच्या मारेकऱ्यांचा नि:पात झाला असला तरी महिलांना सक्षम करण्याचं, सुरक्षित वातावरण देण्याचं आव्हान समाजापुढे कायम आहे.**





दृष्टिक्षेप
**निशिगंधा वाड, अभिनेत्री**

आज महिला स्वतंत्र आहेत. त्यांनी विविध क्षेत्रांमध्ये आघाडी घेतली आहे. स्वत:चं अस्तित्व निर्माण केलं आहे. असं असूनही महिला सक्षमीकरणाची गरज सतत अपेक्षिली जात आहे. निर्भयाच्या मारेकऱ्यांना अखेर फाशी दिलं गेलं. हे दानव काळाच्या उदरात गडप झाले असले तरी समाजापुढली या संदर्भातली आव्हानं कायम आहेत. म्हणूनच यापुढेही महिलांच्या सुरक्षिततेबद्दल साकल्याने विचार झाला पाहिजे. निर्भयावर आली तशी वेळ कोणावरही कधीही येता कामा नये. त्या दृष्टीने समाज, कायदा, मानसिकता महिलाभिमूख व्हायला हवी. सगळं काही एका दिवसात बदलणार नाही. परिस्थिती, मानसिकता बदलायला वेळ लागेल, पण त्या दिशेने वेगवान प्रवास सुरु झाला पाहिजे. आपल्याला अजून बराच मोठा पल्ला गाठायचा आहे. आज महिलांना विविध आघाड्यांवर संघर्ष करावा लागत आहे. पण प्रत्येकानेच आशावादी असायला हवं. महिला सक्षमीकरणाने बराच वेग घेतला आहे. असं असलं तरी महिलांना असंख्य अडचणी, अडथळ्यांना तोंड द्यावं लागत आहे. दर दिवशी नवे प्रश्न उभे ठाकत आहेत. पण या सर्व अडचणींवर, अडथळ्यांवर मात करत महिला प्रगती करत आहेत, पुढे जात आहेत. प्रत्येक समस्येला, प्रश्नाला नव्याने तोंड देत आहेत. हे सगळं वर्षांनुवर्षं असंच सुरू आहे. हा खरं तर न संपणारा संघर्ष आहे. स्त्रियांचा व्यवस्थेशी सुरू असणारा झगडा अद्यापही संपलेला नाही.

या सगळ्या परिस्थितीतून तावूनसुलाखून निघालेल्या महिला मात्र अजिबात मागे हटलेल्या नाहीत. त्यांनी स्वत:ला सिद्ध केलं आहे. समाजाच्या, देशाच्या जडणघडणीत त्यांचा महत्त्वाचा वाटा राहिला आहे. अनेक महिलांनी स्वत: कळ सोसून समाजाच्या उद्धारासाठी प्रयत्न केले आहेत. अशी असंख्य उदाहरणं आपल्यासमोर आहेत. त्यांच्याच कष्टाची गोड फळं आज आपण चाखत आहोत. जिजामातांनी शिवाजी महाराजांना स्वराज्याचा मंत्र दिला. सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे अशा अनेक महिलांनी स्त्रीशिक्षणाच्या कार्यात स्वत:ला झोकून दिलं. प्रसंगी समाजाच्या दूषणांचा स्वीकार केला. चुकीच्या प्रथा, परंपरांना विरोध केला. भारतातल्या पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी यांनीही बऱ्याच खस्ता खाल्ल्या. राणी लक्ष्मीबाईने भारतीय स्वातंत्र्यलढ्यात उडी घेतली. हिरकणी आपल्या मुलासाठी अत्यंत कठीण असा कडा उतरून गेली. एक, दोन नाही तर अशी असंख्य उदाहरणं आज आपल्या प्रत्येकीसाठी प्रेरणादायी आहेत. आज महिला शिकत आहेत, नोकरी करत आहेत, अनेक क्षेत्रांमध्ये नाव कमावत आहेत. हे सगळं या थोर महिलांच्या प्रयत्नांमुळेच शक्य झालं. या महिलांमुळेच आज आपल्याला स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव झाली आहे. त्यामुळे त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन पुढे जाणं गरजेचं आहे. इतकंच नाही, तर पुढच्या पिढ्यांना समानतेच्या वातावरणात जगता यावं यासाठी आत्तापासून प्रयत्न व्हायला हवेत. भविष्यातल्या पिढ्यांना सुरक्षित वातावरण मिळायला हवं. यासाठी आजच्या पिढीने पुढाकार घ्यायला हवा. मागच्या पिढ्यांकडून आपण प्रेरणा घेत आहोत. त्याचप्रमाणे आपणही पुढच्या पिढ्यांनी आपल्याकडून प्रेरणा घेण्यासारखं काही तरी करून जायला हवं.

शिकलेल्या महिला आपल्या कुटुंबाला पुढे नेतात. कुटुंबाच्या जडणघडणीत त्यांचा महत्त्वाचा वाटा असतो. त्याचप्रमाणे देशाच्या आणि समाजाच्या जडणघडणीतही महिलांनी योगदान दिलं आहे आणि आजही देत आहेत. पण समाजाच्या जडणघडणीतला महिलांचा सहभाग आजही मर्यादित आहे. कारण आपल्या पुरुषप्रधान संस्कृतीत महिलांना पुरेशा संधी मिळत नाहीत. संधी मिळाल्यानंतर महिला त्याचं सोनंच करतात, स्वत:ला सिद्ध करून दाखवतात. पण त्यांना तितकंसं प्रोत्साहन मिळत नाही. मुळात पुरुषांचं वर्चस्व असणाऱ्या समाजात स्वत:चं अस्तित्व टिकवून ठेवण्याचं खूप मोठं आव्हान महिलांसमोर असतं. त्यानंतर आपली गुणवत्ता, कौशल्याचा वापर समाजाच्या जडणघडणीसाठी कशा प्रकारे करता येईल, याचा विचार त्या करू शकतात. मात्र या पुरुषप्रधान व्यवस्थेत स्वत:चं अस्तित्व टिकवून ठेवताना त्यांची अर्धीअधिक ऊर्जा संपून जाते. म्हणूनच ही परिस्थिती बदलणं ही आजची गरज आहे. महिलांना स्वत:च्या गुणवत्तेचा वापर करण्यासाठी अधिकाधिक संधी देणं गरजेचं आहे. महिलांना अशी संधी अजिबात मिळत नाही, असं म्हणता येणार नाही. मुळात महिला स्वत:च संधी मिळवत आहेत, पुढे जात आहेत. म्हणूनच आज स्त्री-पुरुष समानतेची गरज आहे. प्रत्येक क्षेत्रात आणि प्रत्येक बाबतीत ही समानता मिळणं आवश्यक आहे. असं झालं तरच महिला खूप वेगाने प्रगती करू लागतील आणि महिला सक्षमीकरण हा शब्द उच्चारावाच लागणार नाही. पुढच्या काही वर्षांमध्ये अशी सकारात्मक परिस्थिती निर्माण होऊ शकेल, अशी आशा करायला काहीच हरकत नाही.

महिलावर्गाला आजही आपले प्राधान्यक्रम ठरवणं खूप जड जातं. महिला अजूनही कुटुंबकबिल्यात अडकल्या आहेत. आजही महिलांना घर सांभाळून नोकरी करावी लागते. घर सांभाळणं हे महिलांचं पहिलं कर्तव्य आहे या मानसिकतेतून अजूनही आपला समाज बाहेर पडलेला नाही. वर्षानुवर्षांची ही परंपरा, ही विचारसरणी मागे टाकून पुढे जाणं महिलांना जमलेलं नाही. नोकरी आणि घर अशा दोन्ही जबाबदाऱ्या पेलताना महिलांना तारेवरची कसरत करावी लागते. विविध आघाड्या पेलणाऱ्या महिलांना सुपरवूमन म्हटलं जातं. सुपरवूमन बनण्याच्या नादात महिला स्वत:चं अस्तित्वच हरवून बसल्या आहेत. आजही कुटुंबाची सगळी जबाबदारी बाईवर टाकली जाते. पण संसार हा दोघांचा असतो. त्यामुळे बायकोप्रमाणेच नवऱ्यानेही आपला वाटा उचलणं गरजेचं आहे. दोघांनीही घरातली जबाबदारी वाटून घ्यायला हवी. असं झालं तर महिलांना मोकळीक मिळू शकेल. आज अनेक घरांमध्ये पती-पत्नी मिळून संसाराची जबाबदारी पेलताना दिसतात. काही सकारात्मक उदाहरणं आपल्या आसपास पहायला मिळतात. पण हा आवाका वाढायला हवा. यासाठी लहानपणापासून समानतेचे संस्कार रुजवायला हवेत. घराघरातला मुलगा-मुलगी हा भेद संपायला हवा. हा भेद संपवणं ही आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे.

देशाच्या उभारणीत महिलांचं मोठं योगदान आहे. त्या आपल्या परिने आपला वाटा उचलत आहेत. महिलांनी काही गावं दत्तक घेतल्याची उदाहरणंही आहेत. कॉर्पोरेट क्षेत्रात त्यांनी स्वत:ची क्षमता सिद्ध केली आहे. शास्त्रज्ञ म्हणूनही त्या कार्यरत आहेत. देशाच्या सीमांच्या रक्षणासाठी महिलावर्ग सज्ज आहे. भारतीय लष्कर, हवाई दल, नौदल या तिन्ही क्षेत्रांमध्ये महिला तैनात केल्या जात आहेत. देशाच्या रक्षणात आपण पुरुषांपेक्षा मागे नाही हे त्यांनी दाखवून दिलं आहे. राजकारणात गेल्यावरच देशासाठी काम करता येतं, असं नाही तर प्रत्येक क्षेत्रातलं महिलांचं योगदान देशाला पुढे घेऊन जात आहे. हे सगळं खूप सकारात्मक आहे. असं असूनही महिलांकडे एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून बघितलं जात नाही. याच कारणामुळे बलात्कार, ॲसिड हल्ल्यांसारख्या घटनांमध्ये वाढ झाल्याचं पहायला मिळतं. महिलांना आपली मतं मांडण्याची, आवडीनिवडी जपण्याची मुभाच मिळत नाही. त्यांना स्वत:चं स्वातंत्र्य जपताच येत नाही. महिलांनी या स्वातंत्र्याचा वापर केला की त्यांच्यावर असे अत्याचार केले जातात. हे सगळं थांबवण्यासाठी महिलांना एक व्यक्ती म्हणून स्वीकारलं गेलं पाहिजे. आपल्याला एक व्यक्ती म्हणून स्वीकारलं जाण्यासाठीही महिलांना लढावं लागत आहे. महिलांचं स्वातंत्र्य अद्यापही मान्य करण्यात आलेलं नाही. म्हणूनच महिलांचा स्वातंत्र्यलढा अजूनही सुरूच आहे आणि यापुढेही सुरू राहणार आहे.

**(लेखिका सजग अभिनेत्री आहेत.)**

**कोरोनाच्या मुकाबल्यासाठी माहिती-तंत्रज्ञान विश्व सिध्द आहे. अलिबाबा उद्योगसमूह क्लाऊड वैज्ञानिक संशोधन संस्थांना एआय संगणकीय क्षमता विनामूल्य उपलब्ध करुन देत आहे. बायडू या सर्च इंजिनने आपले जनुक अनुक्रम अल्गोरिदम वैज्ञानिकांना मोफत उपलब्ध करून दिले आहेत. जगभरचे सीसी टीव्ही साठवत असणाऱ्या व्यक्तींच्या प्रतिमांचं त्वरित विश्लेषण करून व्यक्तींमधली तापाची लक्षणं पडताळण्यासाठी बिग डेटा ॲनॅलिटिक तंत्र वापरलं जात आहे.**

# कोरोना आणि नवतंत्रज्ञान

खास बात
डॉ. दीपक शिकारपूर



सध्या जगभर कोरोना विषाणूंचा संसर्ग गाजत आहे. या धोक्याने अनेक देशांमधल्या लोकांचं पाणी पळवलं. आरोग्य यंत्रणेपासून अर्थजगतापर्यंत अनेक प्रांतांमध्ये सध्या कोरोनाने निर्माण केलेल्या भयाची चर्चा आहे. त्यामुळे हा विषाणू नेमका कुठून आला, त्याचा प्रसार कसा झाला आणि तो संसर्गजन्य कसा ठरला याबद्दल विशेष कुतुहल पहायला मिळतं. मनुष्याला प्राण्यांपासून कोरोनाचा संसर्ग होतो. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशननुसार, हा विषाणू समुद्री खाद्यपदार्थांशी निगडीत आहे. याची सुरुवात चीनच्या हुवेई प्रांताच्या वुहान शहरातल्या सीफूड मार्केटमधून झाली, हे एव्हाना सर्वांनाच माहीत झालं आहे. डब्ल्यूएचओ (वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन)नेही हा विषाणू एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीपर्यंत पसरु शकतो, अशी भीती व्यक्त केली आहे. कोरोना



व्हायरसचा प्रादुर्भाव झालेल्या व्यक्तीला ताप, सर्दी, श्वास घेण्यास त्रास होणं, नाक वाहणं, घसा खवखवणं अशी लक्षणं जाणवतात. कोरोना व्हायरस पहिल्यांदा चीनच्या वुहान शहरातून पसरु लागला आणि त्यानंतर याचे पीडित रुग्ण थायलंड, सिंगापूर, जपानमध्येही आढळून आले. काही दिवसांपूर्वीच इंग्लंडमध्ये एका कुटुंबाला या विषाणूंचा प्रादुर्भाव झाल्याचं समोर आलं होतं. चीनमधील लक्षावधी लोकांना या विषाणूंचा संसर्ग झाला आहे तर इतर देशातील हजारोंनाही हा संसर्ग झाला आहे. हजारो रुग्ण गंभीर आहेत तर काही लाख रुग्ण संशयित असून डॉक्टरांच्या देखरेखीखाली आहेत. चीनमधून अनेक देशांमध्ये हा घातक विषाणू पसरला. २००२-२००३ मध्ये चीनमध्ये आलेल्या सार्स या रोगापेक्षा कोरोना व्हायरस जास्त पसरला. सार्समुळे ७०० बळी गेले होते. कोरोना व्हायरसची सुरुवात चीनच्या वुहान प्रांतात झाली.

कोरोना विषाणूने सध्या जगभर हाहाकार माजवला आहे. याचे दूरगामी परिणाम अनेक देशांच्या (विशेषतः चीनवर) अर्थव्यवस्थेवर होत आहेत. परंतु, आजघडीला जगभरातल्या अनेक शहरांमध्ये याची लागण झाली आहे. इटलीमधलं व्हेनिस हे शहर आज ओस पडलं आहे. व्हेनिसमध्ये रोज किमान ३० लाख पर्यटक भेट देतात. आजमितीला ही संख्या शून्यावर आली आहे. राजधानी दिल्लीसह मुंबई, चेन्नई, बंगळुरू, हैदराबाद, कोची आणि कोलकाताच्या विमानतळांवर थर्मल स्क्रिनिंगची व्यवस्था करण्यात आली आहे. चीन, हाँगकाँग तसंच इतर काही देशांहून परतलेल्या प्रवाशांचं थर्मल स्क्रिनिंग करण्यात येत आहे. पर्यटन उद्योगाला कोरोनाचा सर्वात जास्त फटका बसतो आहे. अर्थात या विषाणूने इतर अनेक उद्योगांना कमी-अधिक प्रमाणात ग्रासलं आहे. या विषाणूमुळे बाधित झालेला रुग्ण प्रथम वुहान शहरात आढळल्याने वुहान व्हायरस असं नाव ठेवण्यात आलं आहे. हा विषाणू कोरोनाव्हायरसच्या कुटूंबाचा एक सदस्य आहे; ज्यामुळे सामान्य सर्दीसारख्या सौम्य परिस्थितीने सुरुवात होऊन त्याचं रूपांतर गंभीर तीव्र श्वसन सिंड्रोमसारख्या प्राणघातक रोगात होऊ शकतं. चीनने या विषाणूच्या मानवी संक्रमणाची पुष्टी केली आहे. जागतिक स्तरावर त्याचा वेगवान प्रसार होत आहे. लाखभर लोकांना त्याची लागण झाली असून काही हजार व्यक्ती मृत्युमुखी पडल्या आहेत तर अनेकजण गंभीर आहेत. याच्या निराकरणासाठी अनेक तंत्रज्ञान उद्योग आर्थिक, तांत्रिक आणि मनुष्यबळाचं योगदान देत आहेत.


चीनमधले क्रमांक एकचे उद्योजक जॅक मा (अलीबाबा चे प्रमुख) यांनी मोठ्या प्रमाणावर आर्थिक तशीच तांत्रिक मदत देऊ केली आहे. अलिबाबा क्लाऊड वैज्ञानिक संशोधन संस्थांना एआय संगणकीय क्षमता विनामूल्य उपलब्ध करुन देत आहे. यावर प्रतिबंधक लस लवकरात लवकर उपलब्ध करण्यासाठी अनेक संशोधक अथक काम करत आहेत. प्राणघातक कोरोनाव्हायरस थांबवण्याचं रहस्य त्याच्या जीनोममध्ये लपलं आहे. चीनमधलं क्रमांक एकचं सर्च इंजिन असलेल्या बायडूने आपले जनुक अनुक्रम अल्गोरिदम वैज्ञानिकांना मोफत उपलब्ध करून दिले आहेत. २००३ मध्ये सार्स विषाणूचा प्रादुर्भाव झाला तेव्हा एखादी प्रभावी लस विकसित व्हायला सुमारे एक वर्षं लागलं होतं. आता काही महिन्यांमध्ये कोरोनाची प्रतिबंधक लस विकसित होईल. सध्या जगभर सर्वत्र सीसी टीव्ही कॅमेरे आहेत आणि ते सतत व्यक्तींच्या प्रतिमा साठवत असतात. या प्रतिमेचं त्वरित विश्लेषण करून त्यापैकी कुठल्या व्यक्तीमध्ये तापाची लक्षणं आहेत ते त्वरित समजण्यासाठी बिग डेटा ॲनॅलिटिक तंत्र अनेक सरकारी कार्यालयं वापरत आहेत. कारण बाधित




व्यक्ती ओळखणं आणि तिला त्वरीत वेगळं ठेवणं अतिमहत्वाचं आहे. अनेक देशांमधली हॉस्पिटल्स गजबजली आहेत. त्यामुळे अशा तपासण्यांचा वेग वाढला पाहिले आणि त्यासाठी सिंगापूरस्थित व्हेरडस लॅबोरेटरीजने पोर्टेबल लॅब-ऑन-चिप डिटेक्शन किट विकसित केलं आहे. यायोगे आपण बाधित आहोत का नाही हे प्रत्येक व्यक्ती स्वतःच ठरवू शकणार आहे.

वैद्यकीय कर्मचाऱ्यांना या विषाणूचा संसर्ग होण्याचा धोका असतो. ते टाळण्यासाठी मेडिकल यंत्रमानव विकसित केले गेले आहेत. ते चिकित्सकांना स्क्रीनद्वारे रुग्णाशी संवाद साधू देतात. हे यंत्रमानव स्टेथोस्कोपसह सुसज्जदेखील आहेत. त्यामुळे रुग्णाला स्पर्श करायची गरजच रहात नाही. चीनमधील प्रमुख बाधित क्षेत्र असलेल्या वुहान इथे वैद्यकीय सामग्री औषधं वितरित करण्यासाठी ड्रोनचा वापर केला जात आहे. त्याचप्रमाणे विशेष रोबोज वापरुन वैद्यकीय कचरा वेगळा काढला जात आहे. मानवी हस्तक्षेप टाळून त्यावर प्रक्रिया होत आहे. कोरोनाबाधीत एत्रामध्ये यंत्रमानव आणि कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'चा वापर वाढत आहे. यासंदर्भातले अनेक किस्से ऐकायला मिळत आहेत. या माध्यमांमुळे उपचारांच्या प्रक्रियेतला मानवी हस्तक्षेप टाळल जात आहेच पण एकूणच उपचार प्रक्रिया अधिक सक्षम केली जात आहे. याचा परिणाम या व्याधीच्या प्रसाराला अटकाव होण्यामध्ये पहायला मिळू शकेल. अमेरिकेतल्या प्रसिद्ध टाईम स्क्वेअर चौकात 'प्रोम्बो' या प्रकारचा यंत्रमानव बसवण्यात आला असून तो तिथे येणाऱ्या लोकांना कोरोनापासून होणाऱ्या रोगाची लक्षणं आणि त्याचा प्रसार रोखण्यासाठी काय करावं याची माहिती देतो. डेन्मार्कच्या 'युव्हीडी रोबोज' या कंपनीने अतिनील किरणांचं उत्सर्जन करणारा यंत्रमानव तयार केला आहे. हा यंत्रमानव हवेतल्या सर्व जीवाणू आणि विषाणूंचा नायनाट करून जागा निर्जंतूक करतो. यामुळे विशेषत रुग्णालयांच्या कर्मचाऱ्यांना कोणताही धोका न पत्करता कोरोनाचा फैलाव रोखता येऊ शकतो, असा दावा कंपनीने केला आहे. त्यांच्या मते हा यंत्रमानव फिरताना तीव्र अतिनील किरणं उत्सर्जित करतो. या किरणांमुळे हवेतले जवळ जवळ सर्व सूक्ष्म जीवजंतू मारले जातात.

चीन आणि इतर आशियाई देशांमध्ये 'व्हीचॅट' हे मेसेंजर ॲप स्मार्टफोनवर लोकप्रिय आहे. त्याचे एक अब्जाहून अधिक वापरकर्ते आहेत. या ॲपने वापरकर्त्यांना जवळचं रुग्णालय शोधण्यात मदत करण्यासाठी बाह्यरुग्ण क्लिनिक नकाशा लाँच केला आहे. कोरोनाच्या उद्रेकानंतर, जगभरात सोशल मीडियावर दहशत पसरली. फेसबुक , ट्विटर आणि लिंक्ड इनने विकृत प्रतिमाप्रसार टाळण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता अल्गोरिदम विकसित करून स्मार्ट यंत्रणेचा अवलंब सुरु केला आहे. ही आपत्ती हे एक जागतिक संकट मानून तंत्रउद्योग आणि संगणक व्यावसायिक जगभर आपल्या परीने आपला खारीचा वाटा उचलत आहेत. इंटरनेट, स्मार्टफोन आणि त्यामधील ॲप्समुळे चांगल्या दर्जाची आरोग्य सेवा, वैद्यकीय सल्ला आणि इतर सुविधा रुग्णांपर्यंत तातडीने (किंवा पुष्कळच वेळेत) पोचवणं शक्य होत आहे.



---

**काश्मीरमधलं कलम ३७० रद्द केल्यानंतर इराणचे अध्यक्ष अयातुल्ला खोमेनी यांनी भारतानं काश्मीरमधल्या लोकांचा आवाज दडपू नये, असं म्हटलं होतं. ती सौम्य भाषा आता कडवट झाली आहे. भारतानं अमेरिकेच्या दबावाखाली इराणकडून तेलखरेदी बंद केल्यामुळे इराण नाराज आहे. अमेरिकेनं घातलेल्या निर्बंधांमुळे अर्थव्यवस्था डळमळीत होत असल्याने इराणला भारताकडून मदतीची अपेक्षा आहे; पण भारत अमेरिकेला दुखावणारी भूमिका घ्यायला तयार नाही.**

# आणखी एक मित्र दुरावतोय...

लक्षवेधी
प्रा. डॉ. विजयकुमार पोटे

चीननं पाकिस्तानमध्ये ग्वादर बंदराच्या विकासाचं काम हाती घेतलं, तेव्हा भारताच्या सागरी वर्चस्वाला तडा जाईल आणि सुरक्षिततेला धोका निर्माण होईल, असं सांगितलं जात होतं. चीन-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉरमुळे भारताला मोठ्या संकटाला सामोरं जावं लागणार होतं. त्याला कसा शह देता येईल आणि पश्चिम आशियातल्या देशांमधून मध्य पूर्वेत अगदी सहजतेनं कसं जाता येईल, याचा विचार सुरू झाला तेव्हा भारतानं इराणमध्ये चाबहार बंदराच्या विकासाचा पर्याय काढला. भारत-अफगाणिस्तान मैत्रीतही इराणच्या चाबहार बंदराचं वेगळं महत्त्व आहे. त्याचं कारण भारतातून अफगाणिस्तानला कोणत्याही वस्तू पाठवायच्या असल्या किंवा तिकडून इकडे येणार असल्या तरी त्या पाकिस्तानमार्गेच येत. पाकिस्तानमधून येताना अफगाणिस्तानच्या मालासोबत अमली पदार्थांची मोठ्या प्रमाणात तस्करी होत होती. हे टाळायचं असेल आणि रस्ते वाहतुकीमुळे होणारा अतिरिक्त खर्च टाळायचा असेल तर चाबहार बंदराचा विकास करण्याचा मुद्दा पुढे आला. डॉ मनमोहन सिंग यांच्या काळात या बंदराच्या विकासाला निधी देण्यात आला. भारतात सत्तांतर होऊन नरेंद्र मोदी यांचं सरकार आलं, तरी परराष्ट्र धोरणात सातत्य राहिलं. मोदी यांनी स्वतः इराणला भेट दिली. इराणचे सर्वोच्च नेते भारताच्या दौऱ्यावर आले. दोन वर्षं भारत आणि इराणमध्ये चांगले संबंध होते; परंतु गेल्या काही महिन्यांमध्ये मात्र दोन्ही देशांदरम्यान तणाव निर्माण होत आहे. इराणमधल्या चाबहार बंदराच्या विकासासाठी भारताने पाच अब्ज डॉलरची गुंतवणूक केली आहे. चाबहार बंदरामुळे ग्वादर बंदराला शह देता येतो तसंच हे बंदर मुंबई-दिल्ली अंतरापेक्षाही कमी अंतरावर असल्यानं भारताला वाहतुकीच्या आणि राजनैतिक संबंधाच्या दृष्टीनं फायदा होतो. पश्चिम आशियाचा व्यापार सुलभ होण्यासाठी इराणचा भारताला उपयोग होतो. भारताला रुपया या चलनात इंधन देणारा इराण हा एकमेव देश आहे. दोन वर्षांपूर्वी इराण आणि भारतात व्यापारी करारही झाले होते. अशा परिस्थितीत तोच इराण आता भारतावर रुष्ट का झाला, याचा शोध घेतला पाहिजे. इराणमधली सत्तेची केंद्रं अशी काही गुंतागुंतीची आहेत. तिथल्या शासकीय यंत्रणेवर तसंच धोरणात्मक निर्णय घेण्याच्या यंत्रणेवर मुल्लामौलवींचा प्रभाव आहे. भारत आणि इराण मैत्रीला आता भारत-अमेरिका आणि भारत-सौदी अरेबियातील वाढत्या मैत्रीचं ग्रहण लागलं आहे. एकीकडे अमेरिका आणि इराणमधील संबंध बिघडले असताना दुसरीकडे भारत आणि अमेरिका मैत्री वाढत आहे. सौदी अरेबिया आणि भारतातली मैत्रीही वाढत आहे. भारतात सौदी अरेबिया मोठी गुंतवणूक करत आहे. त्याने पाकिस्तानशीही पंगा घेतला आहे. सौदी अरेबिया आणि इराणमधलं शत्रुत्त्व वाढलं आहे. जगातल्या मुस्लिम राष्ट्रांचं नेतृत्त्व कुणी करायचं, यावरून इराण, तुर्कस्थानमध्ये स्पर्धा लागली आहे. अशा स्थितीत भारताला एका बाजूनं अमेरिका तर दुसरीकडे इस्राईलवर डोळा ठेवत इराणशी मैत्री वाढवायची आहे. मात्र भारत अमेरिका आणि सौदी अरेबियाच्या आहारी गेला असं वाटत असल्यानं इराणने भारतापासून फटकून रहायचं ठरवलेलं दिसतं.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी तर इराणला धडा शिकवायचा चंग बांधला आहे. ट्रम्प सौदी अरेबिया आणि इस्राइलला खूश करण्यासाठी इराणवर कारवाई करत असतात. भारतानं इराणकडून कच्चं तेल खरेदी करू नये, यासाठी अमेरिकेनं दबाव आणला होताच. अमेरिकेचा दबाव झुगारून भारतानं आपल्याकडून कच्चं तेल खरेदी करावं, अशी इराणची अपेक्षा आहे; मात्र भारत, चीनसह कोणत्याही देशाची सध्या अमेरिकेच्या विरोधात जाण्याची तयारी नाही. गेल्या काही दिवसांमध्ये इराणने दिल्लीतल्या हिंसाचाराच्या मुद्द्यावरून दोन वेळा भारताला लक्ष्य केलं. इराणचे परराष्ट्रमंत्री जावेद झारीफ यांनी भारतात संघटित पद्धतीनं मुस्लिमांविरोधात हिंसाचार करण्यात आल्याचा आरोप केला. झारीफ यांना आंतरराष्ट्रीय वर्तुळात आदराचं स्थान आहे. ते शब्द जपून वापरण्यासाठी ओळखले जातात. असं असताना त्यांनी असं वक्तव्य करणं आणि त्यानंतर लगेचच दुसऱ्या दिवशी भारतानं इराणचे नवी दिल्लीतले राजदूत अली छेगेनी यांना हजर होण्यास सांगून निषेध नोंदवणं या बाबी दोन्ही देशांमधल्या संबंधांमध्ये कटुता आल्याचं लक्षण आहे. पाकिस्तानला शह देण्यासाठीही आपल्याला इराणचा उपयोग होणार होता; परंतु आता तोच इराण पाकिस्तानची तळी उचलून धरत आहे. भारतातला सुधारित नागरिकत्व कायदा, राष्ट्रीय नागरिकत्व नोंदणी हे दोन्ही विषय देशांतर्गत प्रश्न आहेत. असं असताना इराणने भारतावर टीका करावी, हे मैत्रीपर्वाचं लक्षण नक्कीच नाही.



अंतर्गत प्रश्नात लुडबूड करण्यावरून भारतानं इराणला जाब विचारल्यानंतरही तीनच दिवसांनी दिल्लीत झालेल्या हिंसाचारावरुन इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खोमेनी यांनी भारतावर जोरदार टीका केली. 'कट्टर हिंदूंचा सामना करा आणि मुस्लिमांचं हत्याकांड थांबवा, अन्यथा इस्लामिक जगापासून दूर जाऊन एकटे पडाल' असा इशारा त्यांनी भारताला दिला. भारतात मुस्लिमांबरोबर जे झालं, त्यामुळे जगभरातले मुस्लिम दुखी आहेत, असं त्यांनी म्हटलं. अयोध्येत बाबरी मशीद पाडल्यानंतर सात डिसेंबर १९९२ रोजी इराण सरकारने भारताचे तत्कालिन राजदूत हमीद अन्सारी यांना हजर होण्यासाठी समन्स बजावलं होतं. अयातुल्ला अली खोमेनी यांची नाराजीची भावना त्या वेळी अन्सारी यांच्या कानावर घातली होती. १९९२ मध्ये तेहरानमधील भारतीय दूतावासाबाहेर जोरदार आंदोलन झालं होतं. त्यावेळी दगडफेकही करण्यात आली होती. यानंतरही तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांनी सप्टेंबर १९९३ मध्ये इराणचा दौरा केला होता. १९७९ च्या इराणमधल्या इस्लामिक क्रांतीनंतर इराणला भेट देणारे ते पहिले भारतीय पंतप्रधान होते. याआधी इराणने केलेली टीका आणि आता खोमेनी यांनी वापरलेले शब्द यात फरक आहे. भारतानं इराणच्या राजदूताला पाचारण करून आपली नाराजी कळवल्यानंतरही खोमेनी यांनी टीका केली आहे. दिल्ली हिंसाचारावरून ट्विट करताना खोमेनी यांनी अत्यंत कठोर भाषा वापरली.

काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा देणारं कलम ३७० रद्द केल्यानंतर २१ ऑगस्टला खोमेनी यांनी ट्विट केलं होतं. त्यात त्यांनी भारताबरोबर आमचे चांगले संबंध आहेत. काश्मीरबद्दल भारतानं चांगलं धोरण राबवावं. तिथल्या लोकांचा आवाज दडपू नये, असं म्हटलं होतं. ती भाषा सौम्य होती; परंतु आता ही भाषा कडवट झाली आहे. भारतानं अमेरिकेच्या दबावाखाली इराणकडून तेलखरेदी बंद केली आहे. ते इराणच्या नाराजीचं मूळ कारण आहे. अमेरिकेनं घातलेल्या निर्बंधांमुळे इराणची अर्थव्यवस्था डळमळीत झाली आहे. अशा परिस्थितीत इराणला भारताकडून मदतीची अपेक्षा आहे; पण भारत अमेरिकेला दुखावणारी भूमिका घ्यायला तयार नाही. मार्च १९९४ मध्ये संयुक्त राष्ट्र मानवी हक्क आयोगात काश्मीरसंबंधीच्या एका ठरावावर इराणनं भारताची मदत केली होती. इराणचे आताचे राष्ट्राध्यक्ष हसन रुहानी ऑगस्ट १९९४ मध्ये भारतात आले होते. त्या वेळी ते इराणच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे सचिव होते. वर्षभरापासून भारत-इराण संबंध बळकट करण्यासाठी सुरु असलेल्या प्रयत्नांवर त्यांनी पाणी फिरवलं होतं. भारतात अल्पसंख्याकांना कशी वागणूक दिली जाते यापासून हुरियत कॉन्फरन्स कशी महत्वाची आहे इथपर्यंत त्यांनी मुद्दे मांडले होते. त्यामुळे रुहानी यांचा भारत दौरा निष्फळ ठरला होता. आताही इराण त्याच रस्त्यावरून चालला आहे. यापूर्वी २००२ गुजरात दंगलीनंतरही इराणनं इतकी आक्रमक भाषा वापरली नव्हती.

२०१३-१४ मध्ये निर्बंध असताना भारतानं इराणकडून ११ दशलक्ष टन कच्च्या तेलाची आयात केली. २०१८-१९ मध्ये निर्बंधांमधून सवलत असताना भारतानं इराणकडून २४ दशलक्ष टन कच्च्या तेलाची आयात केली होती. असं असताना आता इराण इतकी आक्रमक भूमिका घेत असल्याबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे. भारतानं अमेरिकेबरोबर आपले संबंध अधिकाधिक बळकट करण्यावर भर दिला आहे; पण त्याच वेळी अफगाणिस्तान आणि मध्य आशियाई देशांमध्ये पोहोचण्यासाठी भारताला आपली गरज लागणार हे इराणलाही ठाऊक आहे. अमेरिका-तालिबान करारनंतरही भारतासाठी इराण तितकाच महत्वाचा आहे. अफगाणिस्तानातला पाकिस्तान आणि तालिबानचा प्रभाव लक्षात घेता भारताला इराण आपल्या बाजूला हवा आहे. भारत आणि इराणमधलं मैत्रीपर्व पुन्हा सुरू व्हावं यासाठी परराष्ट्र मंत्रालयाला प्रयत्न करावे लागणार आहेत..

हिंदुस्थान
साहित्य मैफल
रविवार, दि. २२ मार्च २०२०

# स्वागत वसंतऋतूच्या वैभवाचं



**नुकत्याच साजऱ्या झालेल्या होलिकोत्सवात अनिष्ट विचारांची होळी झालीच आहे. या पार्श्वभूमीवर गुढ्या–तोरणं उभारण्यातही अर्थघनता आहे. या निमित्ताने आपणही कोवळीक लेवून निसर्गातून टिपता येणारं रंग–गंध वैभव जपायचं म्हटलं तर चैत्र प्रतिपदेला होणारी नववर्षाची सुरुवात नक्कीच शुभदायी ठरेल. त्या दृष्टीने निसर्गाच्या पाऊलखुणांचा मागोवा घेत वसंतऋतूच्या वैभवाचं महत्त्व जाणून घेऊ या...**

**ख**रं तर माघी पंचमीला वसंतपंचमीच्या सुमुहूर्तावर वसंताचा नाजूकसा पायरव ऐकू येऊ लागतो. चैत्रपालवीच्या रुपात आपल्या पाऊलखुणा तो जागोजागी उमटवू लागतो. प्राचीन पिंपळाच्या बेचक्यातूनही तांबूस–कोवळी पालवी फुटलेली दिसून येते. नित्य–नूतन नाविन्याचं, कोवळिकीचं लेणं जपणारा पिंपळ. दरवर्षी अस्सा... वसंताच्या सादाला प्रतिसाद देतो. सर्वांगानं मुक्त फुललेला चाफा–वसंताचं मनमुराद खुलणं आपल्यापर्यंत पोहोचवतो. पिवळ्याजर्द घोसांनी लदबदलेला बहावा वसंताच्या स्वागताला सज्ज असतो. लालट–शेंदरी गुलमोहोराचे घोस आकर्षक रंगानं साऱ्यांचं लक्ष वेधून घेतात. अंगोपांगी मोहरलेला आंबा नजर उचलून बघायचं नाही म्हटलं, तरी वाऱ्याच्या वेगानं गंधवार्ता पसरवतो... 'आला... वसंत आला... !' आपल्या अंगप्रत्यंगाचा डेरेदार डौलदारपणा सांभाळीत बहरलेला शिरीष नाजूक फुलपाकळ्यांनी साऱ्याच उन्मुक्ततेला एक नाजुकतेची किनार लावतो.

निसर्गाचं हे तोल राखण्याचं, त्याचं त्याला असलेलं भान आपल्यालाही कुठेतरी झिरपलं पाहिजे. तसा तर आपला निसर्गाशी संवाद सुरू असतोच. निसर्गाने वसंतागमनासाठी उभारलेली ही रंगगंधाची सुहावनी तोरणं आणि इकडे आपणही चैत्र–प्रतिपदेच्या निमित्ताने नववर्षाच्या आगमनासाठी उभारलेली गुढ्या–तोरणं! समयसूचकतेचं संतुलन नेमकं साधलं जातं. चैत्र प्रतिप्रतिपदा म्हणजेच गुढीपाडवा... साडेतीन मुहूर्तातला मुहूर्त मानण्याइतकं महत्व या सणाला आहे. शालिवाहन शकाची सुरुवात गुढीपाडवा या दिवसापासून होते. वीरश्री, सद्विचार यासारखे गुण आपल्यातच असले तरी काहीवेळा त्यांना प्रेरित करावं लागतं. हे काम शालिवाहनाने केलं. म्हणून त्या दिवसापासून शालिवाहन शक सुरु झाला. दुसरी कथा श्रीरामचंद्राने जनतेला त्रास देणाऱ्या वालीचा पराभव करुन त्याच्या राज्यातील जनतेची सुटका केली ती याच दिवशी. या आनंदाप्रित्यर्थ लोकांनी घराच्या अंगणात गुढ्या उभारल्या. या गुढ्या म्हणजे विजय पताका – विजयाचं प्रतिक ! हा साऱ्यांसाठीच आनंदाचा, उत्साहाचा सण असतो. साहजिक त्याची तयारी काही दिवस आधीपासूनच सुरू होते. घरा–दाराची स्वच्छता केली जाते. अनेक गावांमध्ये या दिवशी ग्रामदैवताचा उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावाने साजरा केला जातो. या दिवसापासून गावोगावच्या यात्रांना सुरूवात होते. साखरेच्या गाठी तयार करण्याच्या कामास वेग येतो. त्या आकर्षक गाठी पाहणाऱ्यांचं लक्ष वेधून घेतात, त्याच बरोबर गुढी पाडवा जवळ आल्याची जाणीवही होते.


**भक्ती विशेष**

आपल्याकडे गुढी पाडव्याच्या दिवशी एक पध्दत आचरणात आणली जाते. चैत्र प्रतिपदेला सुप्रभाती कडुनिंबाच्या रसाचे सेवन करण्याची ! एरव्ही आपण हा कडू रस घेण्याची टाळाटाळच करु. कडुनिंबाचे औषधी गुणधर्म लक्षात घेऊन 'ठराविक दिवशी हा रस सेवन करावा' असा प्रघात पाडणाऱ्या आपल्या पूर्वजांशी दूरदृष्टी दिसून येते. कडुनिंब रसाचे सेवन करणाऱ्याला निरोगी शरीर लाभते. आणखी एक विशिष्ट अर्थाची डूब या मागे असल्याचे लक्षात येते. कोणत्याही सन्मार्गावरुन चालताना कितीतरी कटु विचारांचे घोट मिळावे लागतात. त्यासाठी कष्ट पडतात. हे कष्ट सुरुवातीलाच घेतले तर पुढील मार्ग सुकर होतो. प्रांतोप्रांती वेगवेगळ्या कथा सांगितल्या जातात. थोड्या–फार फरकाने वेगवेगळ्या प्रथाही पाळल्या जातात. परंतु या सर्वांचा अर्थ लक्षात घेऊन जर आपण चैत्रप्रतिपदेला गुढ्या उभारल्या तर ते नक्कीच संयुक्तिक होईल. काळानुसार परिस्थितीनुसार, संदर्भानुसार अर्थछटात फरक होईल पण अर्थाचा मूळ गाभा तोच राहिल.

गुढी उभारणं म्हणजे विजयपताका फडकावणं ! मग ही विजयपताका माणसाने शत्रुवर मिळवलेल्या विजयाची असेल किंवा माणसाने आपल्यातच अंतर्भूत असलेल्या रिपुंवर मिळवलेल्या विजयाची असेल. प्रत्येक माणसात बऱ्या–वाईट दोन्ही प्रवृत्तींचा साठा असतो. या प्रवृत्तींचा योग्य तो तोल राखणं हे प्रत्येकाच्या हातात असेल. ज्या त्या व्यक्तीच्या विचारशक्तीनुसार तो आपले हे सामर्थ्य वाढवतो. म्हणूनच गुढी–पाडव्याच्या निमित्ताने घरावर गुढ्या उभारताना आपण आपल्याच मनातल्या दुष्ट प्रवृत्तींवर विजय मिळवून स्वतःला सत्प्रवृत्तीच्या मार्गाने जाण्याचा आदेश देतो आहोत का, याचा आपला आपणच जाणीवपूर्वक विचार करायला हवा.

श्रीरामचंद्राने जुलूम करणाऱ्या वालीचा जसा पराभव केला तसाच आपणही आपल्या आजूबाजूला वावरणाऱ्या जुलुमी शक्तींचा समूळ नायनाट करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. घरी–दारी कुठेही कुणावरही आपल्याकडून अगर अन्य कुणाकडून अन्याय होत नाही ना याचाही समतोलपणे विचार झाला पाहिजे. पूर्वापार चालत आलेल्या प्रथा आणि कथा आपल्याला खूप काही सांगत असतात. सारासार विचारबुध्दीने कालमानानुसार त्याचे अर्थ लावावे लागतात. त्यातल्या योग्य छटा निवडाव्या लागतात. निसर्गातील ऋतुचक्र तर कालचक्राप्रमाणे अव्याहत गतिशील राहत असतं. आपल्याला खुणावत असतं. ऋतुचक्राच्या पाळण्यात बसून कालचक्राची गती सांभाळणं आपल्यालाही शक्य आहे.


# दया ही धर्माची जन्मभूमी!



**आ**र्य चाणक्यांनी नीतीशास्त्राच्या माध्यमातून लोकांना उपदेश केला आहे. चाणक्यांनी केलेला उपदेश आजच्या काळात तितकाच सार्थ ठरतो. दया धर्मस्य जन्मभूमी: असं चाणक्यांनी म्हणलं आहे. म्हणजेच दया ही धर्माची जननी किंवा जन्मभूमी आहे.

**चाणक्य नीती**

माणसाच्या मनात दया किंवा सामान्यजनांविषयी हिताची भावना निर्माण झाली की चांगल्या संस्कारांचाही जन्म होतो. याच कारणामुळे दया ही धर्माला जन्म देते. म्हणजेच ती धर्माची जन्मभूमी आहे, असं म्हणता येईल.



# पनौरा गावची देवी भगवती

**उ**त्तराखंडमध्ये शरयू नदीच्या किनारी पनौरा नावाचं गाव आहे. अत्यंत सुंदर अशा या गावात भगवती देवीचं अनोखं मंदिर आहे. या मंदिरात देवीची पूजा आदिशक्तीच्या स्वरुपात केली जाते. या मंदिराचं वैशिष्ट्य म्हणजे इथे देवी बैलावर स्वार झाली आहे. या मंदिराच्या परिसरातच लक्ष्मी आणि सरस्वतीची मंदिरं आहेत. या स्थानी चैत्र आणि शारदीय नवरात्रात जत्रेचं आयोजन केलं जातं. आदिशक्तीच्या या स्थानी भाविक मोठ्या संख्येने गर्दी करतात. इथे साक्षात नागराज वासुकी देवीची सेवा करत असल्याचं म्हटलं जातं. नागराज वासुकी अदृश्य रुपात देवीच्या दर्शनासाठी येत असल्याची भाविकांची श्रद्धा आहे.

**तीर्थाटन**

दुर्गादेवी नेहमीच वाघावर बसलेली असते. पण पनौरा गावातली भगवती देवी बैलावर विराजमान आहे. पनौरा गावावर भगवती देवीची कृपा असल्याचं स्थानिकांचं म्हणणं आहे. देवी भगवतीच्या असीम कृपेमुळे या गावची भूमी सुजलाम सुफलाम असल्याचं भाविकांचं म्हणणं आहे. इथे अन्नधान्याची अजिबात कमतरता नसते. दर वर्षी भरपूर धान्य पिकतं. श्रावण महिन्यात या मंदिरात विशेष पूजेचं आयोजन केलं जातं. बैलावर बसलेली माता भगवती भाविकांच्या सर्व मनोकामना पूर्ण करते, असं म्हटलं जातं.

# ...म्हणून भीष्म गप्प बसले

**कु**रुक्षेत्रावरचं युद्ध अखेरच्या टप्प्यात होतं. कौरव सेनेचा पराभव होत होता. त्यांचे रथी–महारथी धारातीर्थी पडले होते. भीष्म पितामह बाणांच्या शय्येवर शांतपणे पडून होते. युद्ध संपल्यानंतर पांडव आणि द्रौपदी पितामहांना भेटायला आले. त्यावेळी भीष्मांनी पांडवांना धर्माचे, अधर्माचे ज्ञानाचे, नीतीमत्तेचे धडे द्यायला सुरूवात केली. भीष्म धर्माचे नीतीमत्तेचे धडे देत असल्याचं बघून द्रौपदी अस्वस्थ झाली. तिला वस्त्रहरणाचा प्रसंग आठवला. ती भीष्मांना म्हणाली, पितामह, आज आपण धर्माचे, नीतीमत्तेचे धडे देत आहात. पण भर राजसभेत माझं वस्त्रहरण होत असताना आपणही तिथेच होतात. आपण हे सगळं उघड्या डोळ्यांनी बघितलं. त्यावेळी तुम्ही धर्माने का वागला नाहीत? मला का मदत केली नाहीत? समोर अधर्म होत असताना तुम्ही गप्प का बसलात?



**महाभारतातून...**

द्रौपदीचा प्रश्न ऐकून भीष्म अस्वस्थ झाले आणि म्हणाले, पुत्री, एक ना एक दिवस या प्रश्नांची उत्तरं द्यावी लागणार हे मला माहीत होतं. हा अधर्म घडत असतानाही माझ्या मनात हाच विचार सुरू होता. पण त्यावेळी मी दुर्योधनाचं अन्न खात होतो. हे सगळं अन्न पापकर्मांची कमाई होती. हे अन्न खाल्ल्यामुळे माझं मन, मेंदू सगळं काही दुर्योधनाच्या अधीन झालं होतं. मला हे सगळं थांबवायचं होतं. पण दुर्योधनाच्या अन्नाने मला थांबवलं आणि हा अनर्थ घडला.

भीष्माचं हे उत्तर ऐकून द्रौपदी म्हणाली, मग आज आपण ज्ञानाचे धडे कसे काय देत आहात? त्यावर भीष्म म्हणाले, द्रौपदी, अर्जुनाच्या बाणांनी जखमी झाल्यामुळे माझं सगळं रक्त वाहून गेलं. या रक्तात दुर्योधनाचं अन्न होतं. आता माझ्या शरीरात रक्तच उरलेलं नाही. त्यामुळे मी दुर्योधनाच्या प्रभावातून मुक्त झालो आहे. याच कारणामुळे मी आज ज्ञानाचे, नीतीमत्तेचे धडे देत आहे. भीष्माचं उत्तर ऐकून द्रौपदीला समाधान वाटलं आणि तिने त्यांना नमस्कार केला.

# शंकराचं वाहन नंदी

**हिं**दू धर्मातली प्रत्येक देवता वाहनावर स्वार आहे. उंदिर हे गणपतीचं वाहन आहे तर देवी दुर्गा वाघावर बसलेली असते. भगवान शंकराचं वाहन नंदी आहे, हे आपण जाणतो. पण त्याआधी शंकराचं कोणतंही वाहन नव्हतं. शिवशंकर वाहनाशिवायच संपूर्ण ब्रह्मांडात फिरत असत. एके दिवशी यमराजाने शंकराला वाहनाशिवाय फिरताना बघितलं. मग आपणच शिवाचं वाहन व्हावं, असा विचार त्याच्या मनात आला.

पण शंकराला प्रसन्न करून घेणं सोपं नव्हतं. शंकराला प्रसन्न करण्यासाठी यमाने घोर तपश्चर्या केली. यमाच्या तपश्चर्येने शंकर प्रसन्न झाला. यमाने शंकराचं वाहन बनण्याची इच्छा प्रगट केली. त्यावर शंकराने बैलरुपात त्याचा स्वीकार करण्याची तयारी दर्शवली. मग यमराज नंदीच्या रुपात शंकराची सेवा करू लागला. बैल भोळा




असल्यामुळे शंकराने वाहन म्हणून त्याची निवड केली. बैलाच्या मनात कोणाहीबद्दल आकस नसतो. म्हणूनच भोलेनाथाने वाहन म्हणून बैलाची निवड केली. शंकराने नंदीला आपला सेनापती नियुक्त केलं.

**जाणून घ्या**

नंदी हा पावित्र्य, बुध्दी आणि ज्ञानाचं प्रतीक असल्याचं म्हटलं जातं. समुद्रमंथनादरम्यान हलाहल विष बाहेर आलं. हे विष शंकराने प्यायलं. त्या दरम्यान विषाचे काही थेंब जमिनीवर पडले. हे थेंब नंदीने चाटून टाकले. नंदीच्या या कृतीमुळे शंकर खूप प्रसन्न झाला. त्याने नंदीला आपल्या परमभक्ताची उपाधी दिली तसंच आपल्याकडच्या शक्तीही दिल्या. अशा पद्धतीने नंदी शंकराचं वाहन बनून गेला.

# विचारांना तरंगू द्या!



**आ**पल्या मनात विचारांची जंत्री सुरू असते. या विचारांचं कोणतंही मूळ नसल्याचं ओशो रजनीश म्हणतात. ते सांगतात, विचारांना घर नसतं. विचार कधीही एकाच ठिकाणी टिकून राहू शकत नाहीत. हे विचार ढगांप्रमाणे तरंगत असतात. म्हणूनच तुम्ही विचारांशी अजिबात संघर्ष करू नका. विचारांच्या विरोधात जाऊ नका. विचार रोखण्याचा प्रयत्नही करू नका. ओशो सांगतात, बरेच लोक ध्यानधारणेदरम्यान विचार रोखण्याचा प्रयत्न करू लागतात. विचार रोखण्याचे, थांबवण्याचे प्रयत्न कधीही यशस्वी होत नाहीत. कारण विचार रोखणं हा सुद्धा एक विचार आहे. ध्यान करण्याचा प्रयत्न हा सुद्धा एक विचार आहे. म्हणजेच तुम्ही विचार वेगळे करूच शकत नाही. विचारांद्वारे विचारांना रोखणं शक्यच नाही. ओशो सांगतात, एका विचाराला दुसऱ्याशी संघर्ष करायला लावून तुमच्या मनाला युद्धाचं मैदान बनवू नका. तुमचं मन रणभूमी नाही हे कायम लक्षात ठेवा. विचारांशी द्वंद्व करण्यापेक्षा त्यांचा स्वीकार करा. विचारांना तरंगताना अनुभवा. विचार नक्कीच थांबतील. पण तुम्ही त्यांना रोखू नका. तुम्ही थांबवल्याने विचार थांबणार नाहीत, हे नेहमी लक्षात ठेवा.

**ओशो वाणी**

# प्रपंच आणि परमार्थ



**ब**हुता जन्माचा सेवट। नरदेह सापंडे अवचट। येथे वर्तावे चोखट। नीति न्याये।। प्रपंच करावा नेमक। पाहावा परमार्थ विवेक। जेणेकरिता उभय लोक संतुष्ट होती।। तरी आता ऐसे न करावे। बहुत विवेक वर्तावे। इहलोक परत्र साधावे। दोन्हीकडे.।।

प्रपंच आणि परमार्थ या दोहोंचं वर्णन समर्थ रामदास स्वामी करतात. ते म्हणतात की, प्रपंच हा प्रत्येक माणसाच्या जीवनाला व्यापून राहिलेला असतो. त्यातून कोणी माणूस सुटत नाही. त्यात जन्म घेणे, शिकणे, व्यवसायास लागून पैसे मिळवणे, गृहस्थाश्रमी होऊन मुलाबाळांची काळजी घेऊन त्यांना मोठे करणे, त्याचबरोबर आईवडिल व इतरांची जबाबदारी घेंणे व नंतर वृद्धापकाळाची सोय करणे या सगळ्या गोष्टी येतात.

**समर्थ उवाच**

ते पुढे म्हणतात की, या सगळ्या गोष्टी विशेषत: त्यातील व्यवहार व कर्तव्याचा भाग उत्तम रीतीने केला तरच प्रपंच उत्तम रितीने केला असं म्हणता येईल.

श्रीसमर्थांचे वैशिष्ट्य असे की त्यांनी इतर संतांप्रमाणे प्रपंच सोडावा असे न सांगता उलट तो उत्तम करावा. पण त्यातील वासना सोडावी असे सांगितले आहे.

समर्थ म्हणतात की अनेक जन्म नीच योनीत काढल्यानंतर पुण्याईमुळे अचानक मनुष्यजन्म प्राप्त होतो. माणसाने हे जाणून आयुष्यात नीती आणि न्याय यांना धरून आपले वर्तन अतिशय प्रामाणिक, स्वच्छ व चोख ठेवावे. माणसाने प्रपंच नेमकेपणाने म्हणजे नीट करावा. मात्र त्याचबरोबर हा प्रपंच नाशवंत आहे. हे जाणून ज्ञानप्राप्तीसाठी परमार्थ मार्गही धरावा. असे करण्यानेच त्याचे ऐहिक व पारलौकिक दोन्ही सफल होतील. बहुतेक लोक केवळ प्रपंचात गुंतणारे असतात. मानवी जीवन अशाश्वत आहे असे समर्थ अशा लोकांना सांगतात.

# राम–जानकीसाठी वानरसेनेची तैनाती

**भ**गवान श्रीरामाने वानरसेनेच्या साथीने बलाढ्य आणि अहंकारी रावणाचा वध केला. हनुमान हा श्रीरामाचा परमभक्त. वानरकुळातल्या मारुतीरायाने श्रीराम आणि सीतामाईची सेवा केली. उत्तर प्रदेशमधल्या बरेली जिल्ह्यातल्या राम–जानकी मंदिराच्या सुरक्षेसाठी आजही वानरसेना तैनात असल्याचं अनोखं दृश्य पहायला मिळतं. बरेलीमध्ये रामगंगा नदीच्या किनारी राम–जानकी मंदिर आहे. इथे श्रीराम आणि जानकीच्या मूर्ती तर आहेतच शिवाय हनुमानाचीही भव्य मूर्ती आहे. हनुमानाची ही मूर्ती झोपलेल्या अवस्थेत आहे. या मंदिरात भक्तांच्या जटीलातल्या जटील समस्यांचं निराकरण होतं, असं मानलं जातं. म्हणूनच बरेलीसह आसपासच्या जिल्ह्यांमधूनही भाविक या मंदिरात येतात.




या मंदिराशी संबंधित काही आख्यायिका आणि धार्मिक कथा आहेत. संजीवनी वनस्पतीच्या शोधार्थ निघालेला हनुमान बाण लागल्यामुळे याच ठिकाणी मूर्च्छित झाल्याचं म्हटलं जातं. म्हणूनच या मंदिरात हनुमानाची मूर्च्छितावस्थेतली मूर्ती आहे. या मंदिराच्या मार्गात वानरसेना बसल्याचं दृश्य नेहमीच बघायला मिळतं. मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारापासून गाभाऱ्यापर्यंत राम–जानकीच्या सेवेत वानरसेना तैनात असते. इथे येणाऱ्या भाविकांना सर्वप्रथम या वानरसेनेचं दर्शन घडतं.

**अजब गजब**

असंख्य वानरं रांगेत बसलेली असतात. हे दृश्य खूपच विलोभनीय दिसतं. ही वानरं इथे येणाऱ्या भाविकांना अजिबात त्रास देत नाहीत. मंदिर परिसरात फक्त दिवसाच नाही तर रात्रीही वानरं बसलेली असतात. राम–जानकी मंदिरात घडणारा हा प्रकार अनोखाच म्हटला पाहिजे.

# जाणून घ्या समस्येचं कारण

**प्र**त्येकाच्या आयुष्यात समस्या, अडचणी, बाधा येत असतात. या समस्या सोडवताना मुळाशी जाणं गरजेचं आहे. या समस्यांचं नेमकं कारण जाणून घेतलं तर सोडवणं अधिक सोपं होतं. तथागत गौतम बुद्धांच्या या कथेतून आपण हा विचार समजून घेऊ.



गौतम बुद्ध आपल्या शिष्यांना नियमितपणे उपदेश करत असत. एके दिवशी बुद्ध मोठी दोरी घेऊन आले. गौतम बुद्धांच्या हातातली दोरी बघून सर्व शिष्यांना आश्चर्य वाटलं. तथागतांनी ही दोरी कशासाठी आणली असावी असा प्रश्न त्यांना पडला. गौतम बुद्धांनी दोरीला तीन गाठी मारल्या. यानंतर गाठ मारल्यानंतरही ही दोरी आधीसारखीच आहे का, असा प्रश्न त्यांनी शिष्यांना केला. ही दोरी आधीसारखीच आहे किंवा नाही हे प्रत्येकाच्या दृष्टिकोनावर अवलंबून असल्याचं एक शिष्य म्हणाला. तीन गाठी मारण्यात आल्यामुळे दोरी आधीसारखी राहिलेली नाही, असं उत्तर दुसऱ्या शिष्याने दिलं. दोरी तीच आहे पण गाठी मारल्यामुळे तिचं स्वरुप बदललं आहे, असं इतर काही शिष्य म्हणाले.


**बोध**

बुद्धांनी सर्व शिष्यांचं म्हणणं शांतपणे ऐकून घेतलं. त्यानंतर गाठी सोडवण्यासाठी ते दोरी दोन्ही बाजूंनी ओढू लागले. अशा पद्धतीने दोरी ओढल्यानंतर या तिन्ही गाठी सुटतील का, असा प्रश्न त्यांनी शिष्यांना केला. त्यावर या गाठी अजून घट्ट बसतील, असं शिष्य म्हणाले. मग या गाठी सोडवण्यासाठी आपण काय करायला हवं, असं बुद्धांनी विचारलं. या गाठी नेमक्या कशा मारल्या गेल्या आहेत हे बघण्याची गरज असल्याचं मत शिष्यांनी मांडलं. गाठींची रचना जाणून घेतल्यानंतर त्या सोडवता येतील, असं शिष्यांचं म्हणणं होतं.

शिष्यांचं बोलणं ऐकून गौतम बुद्ध खूश झाले. ते म्हणाले, आपण याच पद्धतीने आपल्या समस्यांकडेही बघितलं पाहिजे. आपल्या समस्याही दोरीला मारलेल्या गाठींसारख्याच आहेत. या समस्यांमागचं नेमकं कारण जाणून घेतलं की त्या सोडवणंही सोपं जातं. अन्यथा गुंतागुंत चांगलीच वाढत जाते.

# जीवन जागळे

रचनाकाराची रचना अत्यंत अद्‌भूत व आश्चर्यचकित करणारी आहे. अशा प्रकारची रचना पहिली व शेवटची आहे. सर्व जीवसृष्टी, प्राणीमात्रा, वनस्पती, पंचतत्व सर्व त्याचीच रचना सर्वांनी जीवन जगण्यासाठी आवश्यक सामान त्याचेच. जीवनसृष्टीची एकमेकांवर विसंबून राहण्याची श्रृंखला त्याचीच. सुर्य, चंद्र, तारे, आकाश, धरती, वनस्पती, वारा, अग्नी, पाऊस या सर्वांची स्वयंचलीत यंत्रणा त्यांचीच. सर्व कठपुतली इथे आपापल्या पात्राचे कार्य करतात. पण पुर्ण रंगमंच त्याचाच. या रंगमंचाच्या खेळात प्रत्येक पात्र आपापले कार्य करत असतात ते विरक्त होवून वागले असते. यावर उपाय म्हणून रचनाकारांनी एक सुंदर लुभावनं जाळं टाकलं. हे जाळं म्हणजेच मी पणाचे जाळे होय. या जाळ्यात आपण सर्व अटकलो हे पात्र विसरुन आपण आपले जीवन समजू लागलो. आपले जीवन समजताच सर्व दुर्गुण जमा झाले. काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार हे मुख्य दुगुण व त्यासोबत अनेक वेगवेगळे दुर्गुण यायला लागले एवढे सुंदर असे आपले जीवन. त्याचा आनंद घेण्यासाठी आपल्याला मन दिलं. त्या मनाप्रमाणे भरारी मारुन आनंद घेणे हेच आपले जीवन. परंतु मनुष्य मन व रंगमंच या दोन्ही गोष्टी विसरला आणि बुद्धीप्रमाणे वागूलागला. तो आपले जीवन, आपले नाते, आपले घर, आपला संसार, आपली प्रतिष्ठा, आपले पद, आपला समाज अशा कितीतरी काल्पनिक गोष्टी तयार केल्या. हे सर्व जाळे म्हणजेच स्वत:चा अहंकार आहे. आपण 'मी' पणाचे जाळे स्वत:च तयार कोले व स्वत:च अटकत गेलो आहे. स्वत:च विणलेले जाळे ओळखा व स्वत:ला जाळ्यातून मुक्त करा.



राजीव जगताप
मो. ८४४६५२७०२७

मनाच्या गाठी

मन हे आनंदी व प्रसन्न असले पाहिजे. पाण्यासारखे किंवा हवेसारखे हलके असले पाहिजे. अशा मनामुळे लहानसहान गोष्टींचा आनंद घेता येईल. लहान मुलाप्रमाणे वस्तू वस्तूमध्ये भेदभाव न करता सर्वच वस्तूसोबत खेळता येईल. पण असे न होता मनुष्य भविष्याचा विचार, धन कमावण्याचा लोभ, समाजामध्ये दिखाव्याचा विचार, स्वत:ला उंची गाठण्याची आकांक्षा या सर्वांमुळे वेगळ्याच विचारात धावत असतो. विचारामागे धावता धावता ते विचार पक्के होतात. पक्क्या विचाराच्या अनेक गाठी मनामध्ये घर करुन राहतात. यालाच मनाच्या गाठी म्हणतात. मनाची गाठ ही एक जिद्द असते. त्याची सत्यता न पाहता तो त्यामागे धावत असतो तसे पाहिले तर बदलत्या चेहऱ्याप्रमाणे वेगळा स्वभाव असतो. परंतु सर्वसाधारणपणे व सहजरित्या दिसणाऱ्या गाठीवर लक्ष घालू. त्या अशा, मी हेच खात असतो. ते घाण मी खात नाही. मी शहरातच राहिलो पाहिजे. मला नोकरी मिळालीच पाहिजे. मला असेच घर पाहिजे. मी सर्वांसमोर चांगलाच दिसायला हवे. रोज पेपर वाचलाच पाहिजे. रोज टीव्ही पाहिलाच पाहिजे. चहा पिलाच पाहिजे. मला लोकांनी चांगले म्हटलेच पाहिजे. हे सामान घरात असलेच पाहिजे. खुप लग्न व समारंभात गेलोच पाहिजे. धन कमावलेच पाहिजे. मरेपर्यंत आवक सुरुच पाहिजे व तिच सफलता असते. मुलांना इंग्रजी शाळेत शिकवलेच पाहिजे. घराच्या पोर्चमध्ये गाडी दिसलीच पाहिजे. अंगावर सोनं घातलंच पाहिजे. येणाऱ्यांनी छान म्हणावं यासाठी घरात दोनचार शोभिवंत वस्तू असल्याच पाहिजे. अशा प्रकारची अनेक उदाहरणे देता येतील अशा प्रकारचा अट्टाहास ही जिद्द असते. ती जिद्द पुर्ण केल्यावर मी सुखी होईल ही त्याच्या मनातील दुसरी गाठ. घरात वस्तूचा साठा जमा करता करता व मनातील गाठसाठी धावता धावता जीवनाची संध्याकाळ होते. परंतु तो थांबून सत्य पाहण्याचा प्रयत्न करीत नाही. ती पुर्ण आयुष्य वस्तू जमा करणे, धनासाठी धावणे व समाजात प्रतिष्ठा दाखवणे, यासाठी घालवतो. जीवनभर त्याला सुख, शांती, आनंद यांची अनुभूती होत नाही. तरी तो जीवन व्यवस्थीत पार पडले असे समजून शेवटचा श्वास घेतो. सर्व मानलेले आहे. जाणले काहीच नाही. पुढच्या जन्मात पुन्हा तेच जन्मावर जन्म वाया जात आहे. एखाद्या जन्मात मनावरचा गाठीचा चष्मा काढा व परमानंद घ्या.

# काळप्रवाह

तीन प्रवाहाच्या संगमावर
त्या सांजेला मनंदिराच्या
अथांग लाटेवर
मनाच्या डोहात डोकावून पाहिलं
चुकलेल्या प्रवाहाच्या
लाटा समोर उभा राहिल्या
गलितगात्र नेत्राने त्याकडे पाहत
स्तब्ध उभा होतो
मी वाहिलेला प्रवाह चुकीच्याच मार्गाने गेला का ?
कारण मला आशेचा किरण दिसायचा
मो हुरळून जायचो,
बारकाईने न्याहळत त्या
प्रवाहात लोटून द्यायचो
पण मी प्रवाहाच्या
विरुद्ध दिशेने फेकला जायचो
आणि गटांगळ्या खात
मी प्रवाहाच्या दिशेने वाहतो आहे
याच अनाहूत ओढीने पुढे सरकत रहायचो
अचानक एक छोटा प्रवाह वेगळा झाला
आणि एकदम समोर आला,
तू इथवर उलट्या प्रवाहात वाहत आलास ठीक आहे
पण इथून पुढे तू कोणत्याही अवस्थेत पुढे
सरकू शकणार नाही
तू अपवित्र मनाने विरुद्ध वाहून
आम्हालाही त्या प्रवाहात
आणू शकत नाहीस
तू पुढे जायचं तर आम्हाला मागे मागे ओढतो आहेस.
तुझ्यातला काळप्रवाह हरवला आहे,त्याला शोध!
माझ्या प्रवाहातला काळप्रवाह कधीच हरवला असेल पण शांत प्रवाह व स्वत:चा मूख्य धारेचा
प्रवाह बदलवण्याच्या प्रयत्नात वेगळाच संदेश गेला आणि एका प्रवाहाचे तीन प्रवाह वेगवेगळे झाले.
त्यातल्या छोट्या प्रवाहाने वाट अडवली आणि सांगितलं,
येथून पुढे कोणाला उपसर्ग होऊ देऊ नकोस
तुझ्यातली सत्व शक्ती जागृत कर
त्या प्रवाहाने दिलेला संदेश घेऊन तो छोटा प्रवाह मला कधी येऊन मिळेल याच आशेवर माझ्यातला काळप्रवाह शोधत वाट फुटेल तिकडे वाहतो आहे.

● अंजोर प्रसाद जोशी

स्वानुभव

# ती साठ मिनिटं

वर्गात कसं शिकवावं ह्या विषयावर फ्राम एंट्री टू एक्झिट-अे ट्रिटाइस ऑन क्लास रुम एक्सप्रियंसेस अशा शिर्षकाचं माझं एक इंग्रजी पुस्तक २००९ मध्ये प्रकाशित झालं. १९६६ ते २००३ अशी जवळ जवळ सदतिस वर्ष मी क्लास रुम मध्ये इंजिनिअरींगच्या विद्यार्थ्यांना अकरा वेगवेगळे विषय शिकवले आहेत. ह्यात २००१ ते २००३ मध्ये नागपुरला रायसोनी कॉलेजात प्राचार्य असतांना ही मी वर्गात शिकवलं, ती तिन वर्ष समाविष्ट आहेत. पुढे - पुढे माझा रायसोनीत कामाचा व्याप वाढला अन विशेष म्हणजे ठरल्या वेळी मला वर्गात जाणं शक्य न झाल्यामुळे मी शिकवण सोडलं. पण पुढची तिथली तिन वर्ष एच.व्ही.पी.एम. अमरावती येथील त्याच्या पुढची सहा वर्षे अन आजतागायत मी बऱ्याच इंजिनिअरींग कॉलेजमध्ये फॅक्ल्टी डेव्हलपमेंट ह्या सदराखाली प्राध्यापकांसाठी भाषण देतो. त्यात मुख्यतः इफेक्टीव टिचिंग इन क्लासरुम, टिचिंग लर्निंग इन द प्रेझेंट कान्टेक्स्ट, रिसर्च न्ड रिसर्च मेथडॉलॉजी अन टेक्निकल राइटिंग न्ड प्रेझेंटेशन ह्या प्रत्येकी दोन दोन तासांची भाषणं मी देत असतो. सुरुवातीच्या काही वर्षानंतर मी श्रोत्यांना माझ्या अन माझ्या मित्रांच्या क्लासरुम शिकवण्याच्या अनुभवाबद्दल बरीच उदाहरण, किस्से सांगायला लागलो. ते जास्त परीणामकारक होतंय असं मला वाटल. मग ह्या माझ्या टॉक्सवर आधारीत मी २००९ मध्ये वर सांगितलेलं पुस्तक लिहलं. ते नागपूरच्या एस.जी.आर.मेडिया प्रा. ली. ह्या रासयोनीच्या प्रकाशनात प्रकाशित केलं. मी त्यांनाच कॉपी राइट्स दिले. पहिल्या हजार प्रती संपल्यानंतर मी रासयोनीना विनंती केली की सर हे पुस्तक मला पी.डी.एफ. मध्ये करुन ऑन लाईन सर्वांना विनामुल्य उपलब्ध करुन द्यायचं आहे. तुमची परवानगी द्या. सुनिलजी रासयोनी म्हणाले सर आप इतना इच्छा काम कर रहे हो, मेरे परवानगी की क्या जरुरत है? गो अहेड मग मी त्यात रनिंग वरच आणखी एक प्रकरण वाढवून ते पी.डी.एफ. मध्ये कॉम्प्युटरवर सर्वांना विनामुल्य उपलब्ध होईल ह्याची व्यवस्था केली.

हे पुस्तक जरी इंजिनिअरींगचे प्राध्यापक डोळ्यासमोर धरुन लिहलं असलं तरी त्यातल्या काही काही गोष्टी सर्वच शिक्षकांना-प्राध्यापकांना उपयोगी पडतिल म्हणून त्यातल्या त्या-त्या बाबीचा उल्लेख करण्यासाठी हा प्रपंच करतो आहे. ह्यात मी जे लिहलंय त्यात काही नविन नाही. फक्त वन मोअर रिमाईंडर आहे हे अन काही अनुभवाचे-किस्से आहेत जोडीला.

सर्वात प्रथम म्हणजे जो विषय आपल्याला शिकवायचा आहे, त्याची चांगली तयारी करणं. चांगली तयारी करण्यासाठी त्या त्या विषयाची एका पेक्षा जास्त चांगली चांगली पुस्तकं वाचली पाहिजेत. गाईड्स कधिच वाचू किंवा वापरू नयेत. ह्या चांगल्या पुस्तकामधून मग चांगल्या क्लास नोट्स लिहून तयार कराव्यात, वर्गात पुस्तके घेऊन जाऊ नयेत. असं मी आमच्या प्राध्यापक मंडळींना सांगतो. वर्गात पुस्तकं घेऊन जाण्याचे दोन तोटे आहेत. एक म्हणजे, तुम्ही पुस्तकं घेऊन वर्गात गेलात की विद्यार्थ्यांना वाटतं आज सरांची (किंवा मॅडमची) तयारी नाही. आज हे पुस्तकाची काही पानं वाचून दाखवून वेळ मारुन नेणार आहेत. (फर्स्ट विक सिग्नल) दुसरं म्हणजे ह्या भारी वजनांच्या पुस्तकांना हातात घेऊन हवं ते पान काढून त्यातून पाहून आकृत्या काढणं किंवा समिकरण लिहणं हे अतिशय अवघडून गेल्या सारखं होतं. एका हातात वजन; वर जोरात पंखा चालू; पानं उडतात आहे; पुस्तक अन पान सांभाळता सांभाळता त्रेधा उडते. म्हणून स्वतः लिहलेल्या नोट्स; त्याही, त्या तासाला पुरतिल एवढि आठ-दहा पानंच वर्गात न्यावित. चांगल झटकलेलं डस्टर, हव्या त्या रंगाचे चांगले खडू घेऊन जावेत. वर्गात मरगळल्या सारखा प्रवेश करु नये किंवा डिस्जार्च झालेल्या बॅटरी सारखं बोलू नये. तुमची एनर्जी लेव्हल काय पाहिजे. कपडे व्यवस्थित पाहिजेत. (वर्गात जाण्यापूर्वी स्वतःकडे चांगले पाहून घ्यावं) वेंधळ्यासारकं वर्गात जाऊ नये.

बऱ्याच वेळा विषयाची किंवा टॉपिकची सुरुवात करतांना तो विषय अन तो टॉपिक आपण का शिकवतो आहे अन विद्यार्थ्यांना तो का शिकायचा ह्याचा रिलेव्हंस (संबंध) किंवा कांटेक्स्ट बरेच प्राध्यापक सांगत नाहीत. विद्यार्थ्यांना त्या विषयाची गोडी लावण्यासाठी त्यांची उत्सुकता जागृत करण्यासाठी हे सांगणं फार आवश्यक आहे.

मला आठवतं, १९९३-९४ च्या दरम्यान मी एकदा चिखलीच्या इंजिनिअरींग कॉलेजमध्ये एका सेमिनारचा प्रमुख पाहुणा म्हणून गेलो. तिथे माझे काही जूने विद्यार्थी प्राध्यापक होते. एक जण माझ्याजवळ आला अन म्हणाला सर नमस्कार, मी त्याला ओळखलं. म्हटलं किती वर्षे झालीत तुला इथे? म्हणाला तिन चार वर्ष झालीत सर. मी म्हटलं कुठले विषय अन कोणत्या वर्गाला शिकवतो? तो म्हणाला सर सेकंड इयरला एक विषय अन फायनल इयर मेकॅनिकला एक विषय शिकवतो. मी म्हणालो फायनल ला कोणता विषय शिकवतोस? तो म्हणाला सर Unconventional Energy Sources (अपारंपारिक उर्जा स्त्रोत) मी म्हटलं कशी सुरुवात करतोस? म्हणाला सर अगोदर पारंपारिक अन अपारंपारिक स्त्रोता मधला फरक सांगतो. मग अपारंपारीक चे प्रकार म्हणजे - सोलर एनर्जी, विंड पावर, हायडल पावर, बायोगॅस, एम.एच.डी. वगैरे एक एक सुरु करतो. मी त्याला विचारलं गड्या, आजच्या घडीला आपल्या भारताला कारखाने, वाहतूक, शेती अवजार, घरगुती उपयोग असे सगळे सेक्टरस धरुन किती मेगा वॅट एनर्जी लागते? अन त्यापैकी सध्या आपण किती कन्व्हेन्शनल अन किती अनकनव्हेंशनल सोर्सेस मधून घेतो?

तो पाच मिनंट काहीच बोलला नाही. मी म्हटलं किती मेगा वॉट्स? सांग. निदान अंदाज तरी सांग? तो आणखी थोडा थांबून म्हणाला -

सर, नक्की सांगता येणार नाही पण पंधरा-विस हजार मेगावॉट लागत असतील.

मग मी त्याला सांगितलं जवळ जवळ एक लाख मेगॉ वाट लागतात. त्यापैकी ९० टक्के अजूनही आपण कनव्हेशनल सोर्सेस कडून म्हणजे कोळसा, डिझेल, पेट्रोल, फरनेस ऑईल, केरोसीन ह्यांकडून घेतो. अन ह्यांचे साठे (Reserves) आता फार जलद गतीनं संपत चालले आहेत अन किमती भरमसाठ वाढतात आहे. त्यामुळे लवकरात लवकर आपल्याला अनुकव्हेंशनल रिन्युएबल इनर्जीची गरज आहे. पुढे मी म्हणालो हे सगळ विद्यार्थ्यांना सांगून अन ह्या विषयाचा योग्य संदर्भ अन गांभिर्य सांगून तू ह्या विषयाची सुरुवात केली पाहिजे.

खरं म्हणजे असं हे प्रत्येक विषयासाठी अन टॉपिकसाठी आवश्यक आहे.

१९६९-७० ला औरंगाबाद इंजिनिअरींगच्या एका इलेक्ट्रीकल विभागाच्या सिनिअर प्राध्यापकाची अमरावतीला बदली झाली. मी अमरावतीला मेकॅनिकल विभागात होतो. ह्याच प्राध्यापकांनी मी औरंगाबादला विद्यार्थी असतांना मला १९६४-६५ ला सेकंड इयरला एक विषय शिकवला होता. ते अमरावतीला आल्यानंतर, एक दिवस मी क्लबमध्ये मी त्यांच्या जवळ गेलो अन म्हणालो -

सर मला ओळखलं का?

त्यांनी माझ्याकडे पाहिलं. म्हणाले - हो तु माझा विद्यार्थी होता. मला नाव नाही आठवत तुझ. मी त्यांना नाव सांगितलं अन म्हणालो सर इलेक्ट्रिकमध्ये तिन फेज असतात हे मला बी.ई. पास झाल्यानंतरच कळलं. मला फक्त दोनच फेज माहित होते. ते म्हणाले का बरं बुवा? मी म्हणालो

सर, बोर्डवर तुम्ही पहिला आर, दुसरा वाय अन तिसरा काय म्हणायचे ते आम्हाला एकायलाच यायचे नाही. त्यामुळे मला ३ रा बी माहितच नाही. ते अन इतर मित्र हसायला लागले. मी पुढे म्हणालो - सर तुम्ही विषयात खुप तज्ञ आहात, आम्हाला तुमच्या बद्दल खूप आदर होता पण वर्गात तुम्ही इतकं हळू बोलायचे की पुढच्या दोन रांगेना सोडून मागच्यांना काहीच ऐकायला यायचं नाही.

वर्गात शिकवतांना कधी साठ कधी सत्तर विद्यार्थी वर्गात असतात. सर्वांना ऐकायला जाईल एवढ्या आवाजात बोलणं अत्यंत आवश्यक असतं. पण म्हणून उगाच घसा ओरडून ही चालत नाही. कारण आपली एनर्जी लेव्हल आपल्याला साठ मिनटं टिकवायची असते. घसा खराब करायचा नसतो. आमच्याकडे अमरावतीला मी एम-३ रुम मध्ये फायनल इयरला आय.सी. इंजिन हा विषय शिकवायचो. त्याचवेळी एम-२ रुम मध्ये माझे एक मित्र थेअरी ऑफ मशिन्स हा विषय दुसऱ्या वर्गाला शिकवायचे. ते फार घसा ओरडून - आरडून बोलायचे. एक दिवस मी टी क्लब मध्ये त्यांना म्हणालो -

यार तुम एम-२ मे थिअरी ऑफ मशिनस पढाते हो और मै एम-३ मे आय.सी. इंजिन्स, लेकिन मेरे विद्यार्थी भी थेअरी ऑफ मशिन्स ही सिखते है. तो हसायला लागला. म्हणाला यार क्या करु, मै आवाजपर कंट्रोल करना चाहता हू, पर मेरा पिच बढ ही जाता है.

हे असही व्हायला नको. मी नेहमी प्राध्यापकांना सांगतो की वर्गात गेलं की अंगात आल्यासारखं शिकवायला पाहिजे. म्हणजे अंगात आणायचं नाही,पण इतर सगळं विसरुन, जन्मयतेने शिकवलं पाहिजे. तंद्री लागली पाहिजे, समाधी लागली पाहिजे. मग त्यात खरा आनंद मिळतो. वर्ग झाल्यावर थकल्या सारखं न वाटता, ताज तवानं झाल्यासारखं वाटतं.

१९८६ ला आम्ही अमरावती इंजिनिअरींग कॉलेजमध्ये पार्ट टाईम एम.ई. चा कोर्स सुरु केला. रोज संध्याकाळी सातते नऊ असा एक एक विषय आम्ही शिकवायचो. ज्याचा ज्या दिवशी एम.ई. चा क्लास असेल तो साडे-चार-पाच ला घरी जाऊन फ्रेश होवून, चहा वगैरे घेऊन परत पावणे सात पर्यंत क्लासला यायचा. असाच एक दिवस माझा क्लास असतांना मी साडेचारला घरी आलो. त्या दिवशी माझ डोकं खूप दुखत होतं. अगदि मायग्रेन. तोंड धुतलं. चहा वगैरे झाला पण बरं वाटेना. मला डोके दुखीचा त्रास नेहमीच असायचा. मग माझी बायको सुंठ उगाळून त्याचा लेप डोक्याला लावायची. तासाभरात तो वाळत आला की थोडा आराम पडायचा. त्या दिवशी हे सगळं केलं. सव्वा सहा वाजले तरी आराम पडेना. मग बायको म्हणाली आजज नका जाऊ क्लास ला. मी म्हटलं अग आमचे एम.ई. चे विद्यार्थी पुसद, अकोला, बडनेरा येथून येतात. असं कसं चालेल? मला गेलंच पाहिजे. मी गोळी घेतली, तरी डोक दुखतचं होतं. पण तसाच स्कुटरन कॉलेजला पोहचलो. बरोबर सात वाजता मी एम.ई.चा हिट ट्रान्सफर चा क्लास सुरु केला अन नऊ वाजता संपवून माझ्या रुममध्ये आलो. एक ग्लास पाणी प्यालो. अन अत्यंत प्रामाणिकपणे सांगतो. मला खूप प्रसन्न वाटतं होतं. डोके दुखी वगैरे सगळं गायब, घरी होणाऱ्या वेदनांचा मागमूस नाही. समाधीचं हे असं असतं, विश्वास ठेवा, हे अनेकांनी अनुभवलं असेल.

शिकविण्याचं माध्यम म्हणजे भाषा. आपली भाषा चांगली असली पाहिजे. विशेष करुन इंग्रजी भाषा. कारण ते आमचं शकविण्याचं माध्यम आहे. शिकवणं परीणाम कारक व्हायला चांगल्या भाषेत ते शिकवणं अत्यंत आवश्यक आहे. अब्राहम लिंकननी एका ठिकाणी म्हटलं आहे -

If you give eight hours to cut a tree, I will sharpen my axe for six hours.

आपलं टूल हे शार्प असलं की पुढंच काम सोपं अन जलद होत. लँग्वेज इतकंच महत्व बॉडी लँग्वेजला आहे. उगाच वेड्या वाकड्या हालचाली, हातवारे करणं, तेच ते शब्द परत उच्चारणं, विद्यार्थ्यांच्या नजरेस नजर मिळवून न शिकवणं हे टाळता आलं पाहिजे. विद्यार्थ्यांचं ह्याकडे बारकाईनं लक्ष असतं. आमचे एक मित्र वर्गात गेल्यानंतर पाच सहा मिनटात पायाला आढी घालून उभं राहयचे. ज्या दिवशी त्यांनी असं केलं नाही त्या दिवशी विद्यार्थी ओरडायच. सर कैची-कैची, कैची मारल्या शिवाय सुरवात नाही. आमचे एक दुसरे मित्र बोलतांना दोन्ही हातात हातचे खडू सारखे घोलत राहयचे. लिहायची वेळ येई पर्यंत त्या खडू सारखे घोलत राहयचे. लिहायची वेळ येईपर्यंत त्या खडूचं पिठ झालेलं असायचं. एक तर सारखे टाचा उंच करायचे. कोणि गॉट ईट? गॉट ईन? असं साठ मिनटातं सत्तर वेळा म्हणायचे. हे सगळं टाळता आलं पाहिजे. वर्गात अगदि वेळेवर प्रवेश करणं अन शेवटच्या मिनटापर्यंत वर्ग न सोडणं ह्या गोष्टी शिस्तिनं पाळल्या पाहिजेत. विद्यार्थ्यांना शिकवतांना सहभागी करुन घेणं (Inter active teaching) त्यांना मधून मधून प्रश्न विचारणं, त्यांच्या कडून आलेल्या चुकीच्या उत्तराला न हसता, त्यांना योग्य उत्तरासाठी हिंट्स देणं हे नेहमी करता आलं पाहिजे. संबंधित अन प्रासंगिक विनोदाचं अन उदाहरणांचही तेवढंच महत्व आहे. त्यामुळे वर्गातलं वातावरण प्रफुल्लित होत.

विद्यार्थ्यांना नावाविषयी ओळखणं ही तितकंच गरजेच आहे. वर्गात किंवा वर्गाबाहेर विद्यार्थ्यांमध्ये गुंतवणुक असणं (Involvement) इन फिडरंस नसणं हे अत्यंत महत्वाचं आहे. आपलं शिकवणं खेळीमेळीच, परीणामकारक करण्यासाठी आणखी अनेक गोष्टी मला लिहता येतील पण त्या सगळ्याचा इथे ओहापोह करता येणार नाही. माझं पुस्तक पीडीएफ मध्ये विनामुल्य ऑनलाईन वाचता येईल. मला माज्या इमेल वर तुमचा ईमेल आय.डी. पाठवला तर मी माझं पुस्तक From Entry to Exit - - Treatise on Classroom Experiences हे मी पाठऊ शकेन. संबंधितांना त्याचा उपयोग होईल. विशेषतः इंजिनिअरींगच्या शिक्षकांना.

● डॉ. बी.एन. जाजू
पुणे, मो.नं. ८६६८५५३११५

# गुढी उभारू आरोग्याची !

चीनमधून पसरलेल्या कोरोनाने जगातील अनेक देशांना जीवघेणा विळखा घातला आहे. भारतात केंद्र व राज्यशासन योग्य पध्दतीने या संकटाशी मुकाबला करीत आहे. नागरिकांनी आपल्या आरोग्यासाठी शासन-प्रशासनाला उत्स्फूर्तपणे भक्कम साथ द्यायलाच हवी. येते दोन आठवडे या लढ्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. चार दिवसांवर गुढीपाडवा म्हणजे नववर्षारंभ आला आहे. यंदा आरोग्याची गुढी उभारुन कोरोनामुक्त भारत करण्याचा संकल्प करुया. स्वच्छता केवळ वैयक्तिक पातळीवर न राहता ती सार्वजनिक स्तरावर असणे आवश्यक आहे. सर्वांनी सामाजिक भान बाळगले व



स्वयंशिस्त पाळली तर कोरोनावर मात नक्कीच करता येईल. जागतिक आरोग्य संघटनेने भारताचे अभिनंदन केले आहे. या निमित्ताने लागलेल्या आरोग्याच्या उत्तम सवयी कोरोनाचे संकट दूर झाल्यावरही पुढे पाळल्या तर काही धडा घेतला असे म्हणता येईल.

कोविड १९ हा एक विषाणू असून तो अतिशय वेगाने वाढतो. एका व्यक्तीकडून दुसऱ्याकडे पसरतांना श्वसनयंत्रणा बाधित करतो. रुग्ण खोकल्यावर हवेत तुषार उडतात. ते हवेत पसरतात. तुषारातील कणांमध्ये विषाणू असतात. आजूबाजूच्या व्यक्तींनी श्वास घेतल्यावर त्यातून संसर्गाची शक्यता असते. रुग्णाच्या खोकल्यावाटे काही तुषार त्यातील विषाणूसह आजूबाजूच्या वस्तूंवर पडतात.त्या वस्तूंना हातांचा स्पर्श झाल्यावर ते हातांना चिकटतात. तेच हात चेहऱ्याला,नाकाला, तोंडाला लावले तर ते विषाणू श्वसनमार्गातून आत जाऊन संसर्ग होऊ शकतो. इंडियन मेडिकल असोसिएशनने (आयएमए ) यांनी असे प्रबोधन केले आहे.कोरोनाची लक्षणे जाणून घेतली पाहिजेत.सर्दी, तीव्रपणे घसादुखी,खोकला, ताप,श्वास घेण्यास त्रास, डोकेदुखी, उलट्या व जुलाब ही सर्वसामान्य लक्षणे आढळतात असे सांगण्यात आले आहे.

धोकादायक लक्षणांमध्ये तीव्र घसादुखी,३८ अंशांपेक्षा जास्त ताप, धाप लागणे व छातीत दुखणे, खोकल्यावाटे रक्त पडणे,रक्तदाब कमी होणे, नखे व ओठ काळेनिळे पडणे, मुलांमध्ये चिडचिड व झोपळूपणा वाढणे यांची तीव्रता वाढलेली दिसते. गरोदर माता, मधुमेही, ज्यांना उच्चरक्तदाब आहे अशा व्यक्ती, मूत्रपिंडाचे आजार असणारे, कर्करोगग्रस्त, दमा व सतत खोकला असणारे अशांना कोरोनाचा धोका अधिक असतो. आजाराची लक्षणे आढळून आल्यास आणि शंका असल्यास वेळ न दवडता मान्यताप्राप्त डॉक्टरांचा त्वरित सल्ला घ्यावा. जवळच्या सरकारी इस्पितळात जाऊन कोरोना विषाणूच्या निदानाची तपासणी करून घ्यावी. कोरोनाग्रस्त रुग्णाच्या संकर्पात आलेले तसेच परदेशातून आलेल्यांची सक्तीने तपासणी करण्यात येत आहे. ऐकीव माहिती, शेजाऱ्यापाजाऱ्यांनी दिलेले अनाहूत सल्ले व अफवांवर विश्वास ठेवू नये. भोंदू डॉक्टर, भगत यांचे अशास्त्रीय उपचार घेऊ नयेत असे आवाहन आयएमएच्या पदाधिकाऱ्यांनी व प्रशासकीय यंत्रणेने केले आहे.

कोरोना विकार टाळण्यासाठी वैद्यकीय सल्लयानुसार वागावे. चेहऱ्याला हात लावण्यापूर्वी व अधूनमधून हात स्वच्छ धुवावे. सॅनिटायझरचा वापर करावा. शिंका- खोकला आल्यास तोंडावर स्वच्छ रुमाल किंवा टिश्यू पेपर धरावा. ताप व सर्दी खोकला झालेल्या व्यक्तीचा सहवास टाळावा. पाळीव व अन्य प्राण्यांपासून दूर रहावे. दररोज किमान ३ लिटर पाणी प्यावे. पुरेशी व नियमित झोप घ्यावी. धूम्रपान-मद्यपान करू नये. ५५ अंशापेक्षा जास्त तापमानात कोविड १९ हा विषाणू जीवंत राहात नाही. अंडी, चिकन खाऊ नये हा गैरसमज पसरला आहे. योग्य पध्दतीने पूर्ण शिजवलेल्या मांसाहारातून तो पसरु शकत नाही हे लक्षात ठेवावे. चीनमधून आयात केलेल्या वस्तूंमधून कोरोनाचा विषाणू पसरतो असाही गैरसमज आहे. लसूण खाल्याने कोरोना संसर्ग होत नाही हे विधान दिशाभूल करणारे आहे. कोरोनाच्या विषाणूवर संशोधन सुरु असून अद्याप लस व औषध तयार झालेले नाही.

कोरोनाची बाधा झालेला रुग्ण मृत्युमुखी पडतो हा देखील गैरसमज आहे. अनेक रुग्ण बरे झाल्याची उदाहरणे आहेत. विषाणू संसर्ग झाला तरी रुग्ण पूर्णपणे बरा होतो व रुग्ण दगावण्याची शक्यता अत्यल्प आहे याकडे शासनाने व आयएमएने लक्ष वेधले आहे. अध्यक्ष डॉ.प्रशांत देवरे,उपाध्यक्ष डॉ.हेमंत सोननीस, सचिव डॉ. विशाल गुंजाळ व खजिनदार डॉ.किरण शिंदे यांनी जनहितार्थ प्रबोधन मोहीम राबवली आहे. लहान मुले व ५० वर्षांवरील व्यक्ती यांची विशेष काळजी घेतली पाहिजे. त्यांच्यात रोगप्रतिकारक शक्ती कमी असते. सार्वजनिक ठिकाणी न जाण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. थुंकू नका,हस्तस्पर्श टाळा,हस्तांदोलन टाळून भारतीय पध्दतीने नमस्कार करावा. एकमेकांशी संवाद साधताना दोघांमध्ये किमान एक मीटरचे अंतर ठेवावे. सर्वसामान्य लोकांनी स्वच्छ रुमालाचा वापर करावा. मास्क फक्त रुग्ण, डॉक्टर्स व शुश्रूषा कर्मचाऱ्यांसाठीच आहेत.अशा महत्वाच्या सूचना जनतेला करण्यात येत आहेत. १०४ या टोल फ्री क्रमांकावर तसेच ९९९९६७२२३८/३९ या क्रमांकावर संपर्क साधता येईल. केंद्र सरकारने ०२०-२६१२७३९४ हा हेल्पलाइन क्रमांक जारी केला आहे. या राष्ट्रीय आपत्तीचा मुकाबला सर्वांनी काटेकोरपणे वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छता पाळून एकजुटीने करायला हवा.

● संजय देवधर
(पत्रकार,नाशिक)
९४२२२७२७५५

# सामूहिक दायत्वाची गरज

एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी सर्वाधिक प्रगत आणि आधुनिक संस्कृती प्रस्थापित झालेली असताना करोनाच्या विषाणूने सर्वांत मोठे आव्हान उभे केल्याचे दिसत आहे. एकाच वेळी राजकीय प्रशासकीय पातळीवर आव्हानात्मक ठरणारे हे आव्हान एक समाज म्हणूनही आपला कस कसा लागतो हे तपासत आहे, याची आतापर्यंत सर्वांना कल्पना आली असेल. ही वेळ सर्व प्रकारच्या उपाययोजनांना सामंजस्याने एकीद्वारे आणि सक्रीयतेने योगदान देण्याची आहे. महाराष्ट्राची राजधानी मुंबईमध्ये करोनाचा संसर्ग झाल्यामुळे पहिला मृत्यू झाला आणि गेले काही आठवडे जगभर हैदोस घालणाऱ्या या जीवघेण्या हल्ल्याच्या पल्ल्यात आपण आलो आहोत असे वाटून मुंबईकरांना धास्ती वाटणे साहजिक आहे. मुंबईतील कस्तुरबा रुग्णालयामध्ये उपचार सुरू असताना निधन पावलेल्या सदर ज्येष्ठ नागरिक असलेल्या रुग्णाच्या पत्नी आणि मुलालाही करोनाचा संसर्ग झाला आहे. खबरदारी म्हणून या दोघांनाही अंत्यसंस्काराची परवानगीही नाकारण्यात आल्याचे समजते. ही बाब कुटुंबियांसाठी क्लेषकारक असली तरी सध्या या आजाराचे जीवघेणे स्वरूप पाहता हे व्यक्तिगत दु:खापेक्षा सामाजिक उत्तरदायत्वाचे अधिक आहे. त्यामुळे त्यांनी दाखवलेल्या समंजस्यपणाला मुंबई, महाराष्ट्र, भारत आणि जग असे व्यापक स्वरूप प्राप्त झाले तर या संकटावर आपण एकजुटीद्वारे मात करू शकू. मात्र त्यासाठी आपण माहितीद्वारे सजग करण्याच्या प्रयत्नात विनाकारण भीतीचे वातावरण तयार करीत नाही ना, याचे तारतम्य बाळगण्याचेही आव्हान आपल्यापुढे आहे. या आजाराची विनाकारण भीती वाढवणार नाही याची काळजी घेत असताना आपल्याकडून निष्काळजीपणाकडेही दुर्लक्ष होत नाही, हे पाहायला हवे. सातत्याने हाती येत असलेल्या माहितीत दिवसाभरात नोएडामध्ये एका व्यक्तीला करोनाची लागण झाल्याचे स्पष्ट झाले आहे. याबरोबरच लखनऊमध्येही एका डॉक्टरला करोनाची लागण झाली आहे. कर्नाटकची राजधानी बेंगळुरू येथे करोनाचे दोन नवे रुग्ण सापडले आहेत. हा आकडा देशभरात १५३ वर जाऊन पोहोचला आहे. यांपैकी तीन रुग्णांचा मृत्यू झाला असून १४ रुग्ण पूर्णपणे बरे झाले आहेत. यातील अद्याप सकारात्मक असलेली बाब म्हणजे आपल्या देशात कोणी या विषाणूचा रुग्ण नसून आतापर्यंत सापडलेले सगळे जण परदेशातून भारतात आले आहेत. त्यामुळे या रुग्णांची ओळख पटून त्यांना विलग करण्याच्या प्रयत्नात विमानतळावर तपासणी व परीक्षण यंत्रणा अधिक सक्षम केल्यास त्याला मर्यादित व्यक्तीपर्यंत रोखणे शक्य आहे. हा विषाणू मानवी संपर्काद्वारे पसरतो आणि ताज्या माहितीनुसार त्याचे आयुष्य आधी सांगितल्याप्रमाणे आठ किंवा बारा तासांचे नसून तो चोवीस तास जिवंत राहू शकतो. त्यामुळे आपण स्वच्छतेचे नियम पाळणे, सजग राहणे आणि गर्दी टाळणे हे त्यावरचे परिणामकारक मार्ग आहेत. म्हणूनच राज्य सरकारने गर्दी टाळण्याचे आवाहन केले आहे आणि तद्नुसार निर्णयही घेतले आहेत.

राज्यातील प्रमुख देवस्थानांनीही या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत राज्यातील अनेक प्रमुख देवस्थानांनी मंदिर दर्शनासाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. या विषाणूचा प्रादुर्भाव गर्दीच्या माध्यमातून वाढत असल्याने विविध मंदिरांच्या व्यवस्थापनाने देवदर्शन बंद करण्याचा स्तुत्य निर्णय घेतला. त्याबाबत आपल्या सश्रद्ध जनतेने काळाची गरज ओळखणारा सामंजस्यपणाचा विवेकही जागवून याला सबुरीने घ्यायला हवे. कोल्हापुरातील अंबाबाई मंदिर बुधवारपासून दर्शनासाठी भाविकांना पूर्णपणे बंद करण्यात आले तर अहमदनगर शहराचे ग्रामदैवत असलेल्या श्री विशाल गणेश मंदिर आणि शनी मारूती मंदिर दर्शनासाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेतला गेला. या संसर्गाची भयावहता लक्षात घेऊन मुस्लिम समाजही पुढे येत असून केवळ रोजची नमाजच नव्हे तर शुक्रवारची नमाजही घरच्या घरी प्रत्येकाने करावी असा निर्णय कोल्हापूरमध्ये घेण्यात येत आहे. करोनाचा संसर्ग आटोक्यात ठेवण्याचे एक मोठे आव्हान जगापुढे ठाकले आहे हे खरे असले तरी त्यावर आपण मात करण्यासाठी आपण काय काय करू शकतो, याचीही उदाहरणे पुढे येत आहेत. या विषाणूचे भयावह थैमान इटलीत दिसले आणि परिणामी २५०० हून अधिक जणांचा मृत्यू झाला.. मात्र त्याच बरोबर तेथे जवळपास ३००० जणांवर यशस्वी उपचार झाले आहेत. अमेरिकेत ११६ जणांचा मृत्यू झाला आहे आणि १०६ जणांवर यशस्वी उपचारही झाले आहेत. त्यामुळे आता घरून काम करण्याचे तारतम्य विनाकारण मोकाट फिरण्यात हरवता कामा नये. गर्दी टाळायलाच हवी. त्यासाठी काय करता येईल याचा आपण विचार करायला हवा आणि प्रशासन घेत असलेल्या निर्णयांनाही बळ द्यायला हवे.

हिंदुस्थान साहित्य मैफल
रविवार, दि. २२ मार्च २०२०

शब्दशोध या सदरात खाली दिलेल्या प्रश्नांच्या उत्तरांना चौकटीत गोलाकार आकाराने शब्दबंद करावयाचे आहे.


शब्द शोध

१) वाईन बनवण्यास उपयुक्त असणारं फळ : **द्राक्ष.**
२) लांबट दाणा असलेला भात पिकाचा सुवासिक वाण : **सुगंधा.**
३) लव्हाळा, हरळी, माठ, दुधानी या तणांच्या बंदोबस्तासाठी उगवण्यापूर्वी वापरण्याचं तणनाशक : **अट्रेसीन.**
४) विदर्भात शेतीकामासाठी प्रसिद्ध बैलाची जात : **गौळाऊ.**
५) सूत्रकृमी नियंत्रणासाठी उपयुक्त ठरणाऱ्या सुत्रकृमीनाशक रसायनाचं नाव : **फोरेट.**
६) बाजरीच्या कणसात दाणे भरण्याऐवजी स्पॅसीलोथिका रिलीयाणा या काळ्या बुरशीची वाढ होणं असा रोग : **दाणे काणी.**
७) राजमाची एक जात : **वरूण.**
८) मटणासाठी प्रसिध्द असलेली उत्तम शेळीची जात : **उस्मानाबादी.**
९) वाल भाजीपाला पिकाचा सुधारित वाण : **फुले अश्विनी.**
१०) हिरवळीचं खत म्हणून उपयुक्त, परंतु फारशी माहीत नसलेली पाणवनस्पती : **अझोला.**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| द्र | क्ष | अ | फो | गौ | सु | व |
| अ | दा | झो | रे | ळा | गं | रू |
| ट्रे | णे | ला | ट | ऊ | धा | ण |
| सी | का | फु | ले | अ | श्वि | नी |
| न | णी | उ | स्मा | ना | बा | दी |

**शेती व्यवसायाचा विचार करताना आपल्याकडे अजुनही मध्यमवर्गीय तसंच अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या विचारात घेण्याजोगी असल्याचं निदर्शनास येतं. त्यामुळे अशा सामान्य शेतकऱ्यांसाठी ठरावीक स्वरुपाचं उत्पन्न सातत्यानं मिळवून देणाऱ्या पिकांच्या लागवडीचा विचार महत्त्वाचा ठरणार आहे. त्यादृष्टीने कागदी लिंबाच्या लागवडीविषयी जाणून घ्यायला हवं.**

# सोप्या लागवडीतून उत्पन्नाची हमी



शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा विचार समोर येतो त्यावेळी शेती व्यवसायात त्या त्या हंगामात घेतली जाणारी पिकं, त्यांचा दर्जा, पिकांना मिळणारी बाजारपेठ, उत्पादन खर्चाच्या मानाने मिळणारा भाव या बाबींवर प्रकाश टाकणं गरजेचं ठरतं. खरं तर आजही शेती क्षेत्रातील उत्पादनं ही आठवडी बाजारात अधिक प्रमाणात विक्रीसाठी आणली जातात. या विक्रीतून मिळणाऱ्या नफ्यावर अनेक शेतकरी कुटुंबांच्या त्या आठवड्यातील दैनंदिन आणि जीवनावश्यक गरजा भागवल्या जातात. तसंच शेतमजुरांचे पगार अजूनही आठवड्याला केले जातात. त्यामुळे पुढील आठवड्यासाठीच्या जीवनावश्यक वस्तू त्या पगारातूनच खरेदी केल्या जातात.

या पार्श्वभूमीवर शेती व्यवसायाचा विचार करताना आपल्याकडे अजुनही मध्यमवर्गीय तसंच अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या विचारात घेण्याजोगी असल्याचं निदर्शनास येतं. त्यामुळे अशा सामान्य शेतकऱ्यांसाठी ठरावीक स्वरुपाचं उत्पन्न सातत्यानं मिळवून देणाऱ्या पिकांच्या लागवडीचा विचार महत्त्वाचा ठरणार आहे. त्यादृष्टीने कागदी लिंबाच्या लागवडीविषयी जाणून घ्यायला हवं. वास्तविक लिंबू हे फळवर्गीय असल्याने त्याची लागवडही सहजासहजी करता येते. राज्यात कोकण विभाग सोडला तर सर्व जिल्ह्योमध्ये थोड्या–फार प्रमाणात कागदी लिंबाचं उत्पादन घेतलं जातं. १९९०–१९९१ मध्ये शंभर टक्के अनुदानावर आधारित रोजगार हमी योजनेअंतर्गत फळझाडे लागवडीचा कार्यक्रम राबवण्याचा क्रांतीकारी निर्णय घेण्यात आला. यामुळे नंतरच्या काळात फळबागाखाली असणाऱ्या क्षेत्रात भरीव वाढ झाली. कागदी लिंबू या फळवर्गीय पिकाखालील क्षेत्रात प्रामुख्याने अहमदनगर, पुणे, सोलापूर, सांगली, धुळे, जळगाव, परभणी, उस्मानाबाद, अकोला, बुलढाणा आणि नागपूर या जिल्ह्यांचा समावेश आहे. अर्थात, इतरही अनेक जिल्ह्यांमध्ये थोड्या–फार प्रमाणात का होईना, कागदी लिंबाची लागवड होत असल्याचं पहायला मिळतं. विशेष म्हणजे बऱ्याच जिल्ह्यांमध्ये स्थानिक जातीच्या चांगल्या लिंबूवर्गीय फळांची स्वतंत्रपणे स्वतःचं बी धरून रोपं तयार केली जातात. तसंच या रोपांची विक्रीही केली जाते. लिंबाच्या या रोपांनाही चांगली मागणी आहे. लिंबाच्या झाडावरून खाली पडलेली आणि पिवळी फळं गोळा करणं, जवळच्या किंवा आठवडा बाजारात मिळेल त्या वाहनातून ती पोहोचवणं या प्रक्रियेमुळे फळांच्या प्रतीवर आणि दर्जावर प्रतिकूल परिणाम होतो.

अशा परिस्थितीत कागदी लिंबांची फक्त विक्री करण्याऐवजी त्याच्या प्रक्रिया उद्योगाला महत्त्व दिल्यास अधिक नफा मिळणं शक्य होतं. वास्तविक, शीतपेयांमध्ये कृत्रिम पद्धतीने तयार केलेलं लिम्का पेय लोकप्रिय होऊ शकतं तर शुद्ध लिंबाच्या रसापासून तयार केलेलं पेय लोकप्रिय का होणार नाही, हा विचारात घेण्याजोगा भाग आहे. मात्र यासाठी प्रामाणिकपणे व्यापक प्रमाणात प्रयत्न होताना दिसत नाहीत. साखर कारखान्यांचा गळीत हंगाम बंद होतो त्यावेळी कागदी लिंबाला भाव नसतो. अशा परिस्थितीत साखर कारखान्यांनी थोडेसं भांडवल गुंतवून लिंबाचा रस तयार करणं, तिखट लोणचं, लिंबू–मिरची लोणचं, चटणी, लिंबाची पावडर, सायट्रीक ॲसिड, पित्तशामक औषधी आदी छोटे व्यवसाय सुरू केल्यास शेतकऱ्यांच्या या पिकाला चांगला भाव तर मिळेलच शिवाय अनेकांना रोजगारही उपलब्ध होईल. हे करताना कारखान्यालाही नफा मिळवणं शक्य होणार आहे. कागदी लिंबाची आखाती देशांमध्ये तसंच युरोपमध्ये निर्यात केल्यास लिंबू उत्पादकांना खऱ्या अर्थाने न्याय मिळू शकेल असं वाटतं.

**कृषी विशेष**

**प्रा. मुकुंद गायकवाड**

सामान्यपणे लिंबाच्या एका बीमध्ये अनेक भ्रूण असतात. हे बी जमिनीत पेरले की त्यापासून एकापेक्षा जास्त रोपं निघतात. बहुतेक रोपं फलन न झालेल्या भ्रुणापासून वाढलेली असतात. त्यामुळे अगदी सोप्या पद्धतीनं फक्त बी लावून शेतकरी कागदी लिंबाची रोपवाटीका तयार करू शकतो. लिंबाचं बी ४० पीपीएम तीव्रतेच्या जेए किंवा एनए संजीवकाच्या द्रावणात चोवीस तास भिजत ठेवल्यास बियांची उगवण लवकर होते. तसंच त्याची टक्केवारीही वाढते. बियांची पेरणी गादी वाफ्यावर सप्टेंबर–ऑक्टोबर महिन्यात करावी. सहा ते सात टक्के ओलावा असलेले बी पॉलिथिन पिशवीत आणि लॅमिनेटेड पिशवीत साठवून ठेवल्यास अकरा ते बारा महिन्यांनी त्यांची उगवणशक्ती नष्ट होते. वेगळ्या पद्धतीनं कागदी लिंबाची रोपं तयार करण्यासाठी ७५ सेंटीमीटर रुंद आणि ३० सेंटिमीटर खोल तसंच जमिनीच्या पद्धतीप्रमाणे लांबी असलेला चर खोदावा. तळाशी १० सेंटीमीटर जाडीचा पाला–पाचोळ्याचा किंवा उसाच्या पाचटाचा थर देऊन हा चर खत तसंच मातीनं भरून घ्यावा. त्यात गादी वाफ्याप्रमाणे बी पेरावं. या वाफ्यांना पाणी देणं सोपं असतं. मुळं गवतात जाऊन थांबत असल्याने ही रोपं काढताना न तुटता सहज निघतात. ती प्लास्टिकच्या पिशवीत भरता येतात किंवा तशीच ओल्या तरटात बांधून लावणीसाठी नेता येतात. अशा रितीने लिंबाच्या लागवडीची तयारी करता येते.

या पिकाच्या संदर्भात लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे हस्तभाराच्या वेळेस पाऊस आल्यास लिंबाला ताण बसत नाही. यावर उपाय म्हणून ही झाडे ताणावर सोडताना ५० पीपीएम अस्कॉल्बीक ॲसिड आणि १० पीपीएम डिब्रीॲलिक ॲसिडची फवारणी करावी. हस्तभार घेण्याकरता लिंबू झाडावर मृगभाराची फळे नसावी. त्याच प्रमाणे ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात झाडांना वाफे तयार करून प्रत्येक झाडास ३०० ग्रॅम नत्र, ३०० ग्रॅम स्फुरद आणि ३०० ग्रॅम पालाश या रासायनिक खतांची मात्रा द्यावी तसंच ओलीत सुरू करावी. अशा प्रकारे योग्य काळजी घेतल्यास एका झाडापासून एक ते दोन हजार फळांचं उत्पादन मिळू शकतं. उन्हाळ्यात लिंबांना अधिक दर मिळतो. शिवाय मागणीही जास्त असते. त्यामुळे या काळात लिंबं विक्रीसाठी उपलब्ध होतील यादृष्टीने नियोजन केल्यास हमखास उत्पन्नाची खात्री राहते.

# ठिबक, तुषारसाठी अनुदान

**पीक नियोजन**

अलिकडच्या काळात पावसाचा वाढत चाललेला लहरीपणा, भूगर्भातील वेगाने घटत चाललेली पाणी पातळी या बाबी लक्षात घेता पाण्याचा काटकसरीने वापर गरजेचा ठरत आहे. हेच तत्त्व कृषी क्षेत्रालाही लागू होतं. या क्षेत्रात पाण्याच्या वापरावर नियंत्रण आणलं जावं, असा आग्रह वेळोवेळी धरण्यात आला. त्यातून अल्प पाण्यावरील पिकांच्या उत्पादनांवर भर दिला जाऊ लागला. त्यादृष्टीने ठिबक तसंच तुषार सिंचनाचं तंत्र अतिशय महत्त्वाचं ठरलं. या पार्श्वभूमीवर राज्यात राबवण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत ठिबक आणि तुषार सिंचन संच बसविण्यासाठी उर्वरित १०७ तालुक्यातील अल्प आणि अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ८० टक्के अनुदान तसंच इतर शेतकऱ्यांना ७५ टक्के अनुदान देण्याचा निर्णय राज्य शासनानं नुकताच घेतला. यापूर्वी नऊ जुलै २०१९ रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार, विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्याप्रवण १४ जिल्हे, तीन नक्षलग्रस्त जिल्हे अशा १७ जिल्ह्यांमधील सर्व तालुके तसंच उर्वरित महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण तालुके अशा राज्यातील एकूण २४४ तालुक्यांमध्ये मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना राबवण्यात येत आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ठिबक सिंचन वा तुषार सिंचन संच बसवण्यासाठी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत अल्प आणि अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना देय असलेल्या ५५ टक्के अनुदानास २५ टक्के पूरक अनुदान देऊन एकूण ८० टक्के अनुदान देण्यात येत आहे. तसंच इतर शेतकऱ्यांना कमाल पाच हेक्टर क्षेत्रासाठी देय ४५ टक्के अनुदानास ३० टक्के पूरक अनुदान देऊन ७५ टक्के अनुदान देण्यात येत आहे.

अशा स्थितीत आता या योजनेंतर्गत राज्यातील उर्वरित १०७ तालुक्यातील अल्प आणि अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांनादेखील ८० टक्के अनुदान देण्याचा तसंच इतर शेतकऱ्यांना ७५ टक्के अनुदान देण्याचा निर्णय राज्य शासनानं घेतला आहे. त्याच बरोबर १०७ तालुक्यांमध्ये शेतकऱ्यांना शेततळ्यांचं प्लास्टिक अस्तरीकरण करण्यासाठी प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के किंवा ७५ हजार रुपये यापैकी कमी असेल ते अनुदान देण्याचा निर्णयही राज्य शासनानं घेतला आहे. हे दोन्ही निर्णय राज्यातील संबंधित विभागातील शेतकऱ्यांना दिलासा देणारे आहेत. अशा प्रकारच्या प्रोत्साहनामुळे ठिबकखालील क्षेत्रात वाढ होऊन शेती व्यवसायात नियंत्रित पध्दतीने पाण्याचा वापर शक्य होणार आहे.

## चिकू उत्पादक अडचणीतच

चिकू उत्पादकांना गेल्या हंगामातील चिकू फळ पीकविम्याची रक्कम अजूनही मिळाली नसल्यानं या पिकाच्या व्यवसायावर परिणाम झाला आहे. शिवाय यंदाच्या विम्याच्या अटी–शर्तीमध्ये काही जाचक मानांकनं घातली गेल्यानं अधिकांश शेतकऱ्यांना ५० टक्केच विम्याची रक्कम मिळण्याची शक्यता आहे. गेल्या पावसाळी हंगामात चिकू बागायतदारांनी फळ पीकविमा योजनेमध्ये आपला सहभाग नोंदवला होता. या शेतकऱ्यांनी प्रति हेक्टरी २,७५० रुपयांचा विम्याचा हप्ता भरला आहे. अशा परिस्थितीत चार ते आठ दिवस ९० टक्के सापेक्ष आर्द्रता तसंच २० मिलीमीटरपेक्षा अधिक पावसाच्या नोंदीच्या आधारे बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी ५५ हजार रुपयांची विमा रक्कम ३१ डिसेंबरपूर्वी मिळणं अपेक्षित होतं. त्यादृष्टीने विमा कंपनीनं हवामानाच्या माहितीसाठी स्कायमेट या शासकीय संस्थेचा आधार घेऊन हवेतील सापेक्ष आर्द्रता तसंच पर्जन्यमानाविषयीची माहिती संकलित केली.



त्यातच अवकाळी पाऊस, गारपीट, अतिवृष्टी आदी नैसर्गिक संकटांमुळे यावेळी चिकूच्या पिकाचं मोठया प्रमाणात नुकसान झालं. असं असताना पीकविम्याच्या अटींची पूर्तता होत नसल्यानं शेतकऱ्यांमध्ये असंतोष पसरला आहे. नैसर्गिक संकटात पिकाचं प्रत्यक्ष नुकसान झालेल्या अधिकांश शेतकऱ्यांना विम्याचा लाभ होत नसल्यानं झालेल्या चिकू पिकाच्या नुकसानीचा फेरआढावा घेऊन फळपीक विम्याचा पुन्हा विचार करण्याची मागणी चिकू बागायतदार संघटनेतर्फे करण्यात आली होती.

खरं तर शेतकऱ्यांनी भरलेल्या विम्याच्या हप्त्याइतकीच रक्कम राज्य शासनानं संबंधित विमा कंपनीला देणं आवश्यक आहे. परंतु ही रक्कम भरली गेली नसल्यानं विमा भरपाईच्या रकमेचं वितरण अजूनही झालं नसल्याचं दिसून येतं. वास्तविक अतिवृष्टी आणि लांबलेला पावसाळा यांमुळं चिकू बागायतदारांचं पावसाळ्यातील बहुतांश उत्पादन संपुष्टात आलं होतं. अशा स्थितीत चिकूच्या बागांची साफसफाई, मशागत आदी कामांसाठी लागणाऱ्या खेळत्या भागभांडवलाची कमतरता उत्पादकांना भेडसावत आहे. हे लक्षात घेऊन या उत्पादकांना पीक विम्याची रक्कम तत्काळ मिळणं अतिशय महत्त्वाचं आहे.

**जाणून घ्या**

## सौरऊर्जेतून शेतीला दिवसा वीज

सौर कृषिपंप योजनेद्वारे कृषिपंपांना दिवसा वीज पुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी दहा हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. वास्तविक गेल्या दोन वर्षांपासून उर्वरित महाराष्ट्रात शेती पंपासाठी नवीन वीज जोडणी देणं बंद आहे. अशा स्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शेतीपंपासाठी उर्वरित महाराष्ट्रात लघुदाब वीज वाहिन्यांवरून नवीन वीज जोडण्या देण्याची घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली. त्यानुसार आशियाई विकास बँकेच्या सहकार्यातून ही योजना संपूर्ण राज्यात लागू करण्यात येणार आहे. सौर कृषिपंप योजना पुढील पाच वर्षांसाठी करण्यात आली असून या योजनाद्वारे प्रतिवर्ष एक लाख पाच हजार सौर कृषिपंप देण्यात येणार आहे. या अर्थसंकल्पात सदर योजनेसाठी ६७० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्याच बरोबर कृषिपंपाना दिवसा कमीत कमी चार तास वीज देण्याची घोषणा ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी केली आहे. सौर ऊर्जेचा वापर करून शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करणं शक्य आहे. त्यामुळे उद्योगांवर असलेला क्रॉस सबसिडीचा बोजाही कमी होण्यास मदत होईल. सध्या सरासरी वीजपुरवठा दर साडेसहा रुपये असून कृषिपंपाना एक रुपया ८८ पैसे या सवलतीच्या दरानं वीजपुरवठा करण्यात येतो; मात्र, यासाठी उद्योगांवर क्रॉस सबसिडी लावून तूट भरण्यात येते. आपल्याकडे जवळपास वर्षभर दिवसा मुबलक प्रमाणात स्वच्छ सूर्यप्रकाश उपलब्ध असल्यामुळे सौर वीजनिर्मिती करून कृषिपंपाची वीजेची गरज भागवता येणं सहजशक्य आहे. त्यादृष्टीने शासनाची ही पावलं महत्त्वाची मानली जात आहेत.

## शंका–समाधान

**पीक व्यवस्थापनातील तापमानाचं महत्त्व जाणून घ्यायचं आहे. त्याची माहिती मिळेल का?**

– भरवशाचा पाऊस आणि पाणी टंचाई बरोबरच पिकांच्या वाढीवर परिणाम करणारा तापमान हासुद्धा महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे याही घटकाचा विचार महत्त्वाचा ठरतो. त्याच्या आधारे पीक लागवडीचं नियोजन करता येणं शक्य आहे. प्रत्येक पिकाच्या वाढीसाठी कमाल, किमान आणि मध्यम तापमानाची गरज असते. बहुतांशी पिके ही ५ ते ३२ अंश से. तापमानात उत्तम प्रकारे वाढतात. तापमान अती उच्च किंवा अती थंड असेल तर पिकांची वाढ थांबते किंवा काही प्रकारची पिकं नष्ट होतात. सर्वसाधारणपणे ४३ ते ५५ अंश से. तापमानास बहुतांशी पिकं नष्ट होण्यास सुरूवात होते. म्हणून शेती करताना तापमानाचं महत्त्वही जाणून घ्यायला हवं.

तापमानाचे पिकांवर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष परिणाम होतात. प्रत्यक्ष परिणामांमध्ये पिकांची पालेवाढ, फळधारणा, फळांची वाढ, फळझाडास विविध प्रकारची इजा, सुप्तावस्था आणि झाडांच्या पेशींची वाढ तर अप्रत्यक्ष परिणामांमध्ये कीड, रोग, इतर वनस्पतींची वाढ यांचा समावेश होतो. वातावरणातील तापमान शून्य अंश से. पेक्षा कमी आणि ३५ अंश से. पेक्षा जास्त वाढल्यास बहुतांश पिकांवर विशेषत: भाजीपाला, फळ पिकांवर प्रतिकूल परिणाम होतो. अशा वेळी वाढ खुंटते, परागीकरण आणि फळधारणेवर परिणाम होतो. तसंच पिकांचा कालावधी कमी होतो. उत्पन्नात घट येते आणि शेतमालाची प्रत खालावते.

खरं तर अनेक प्रकारच्या पिकांची वाढ विशिष्ट भागात होणं, न होणं हे तेथील तापमानावर अवलंबून असते. एकाच पिकातील प्रत्येक जातीच्या पिकाला विशिष्ट तापमानाचा पल्ला मानवतो. त्यापेक्षा जास्त किंवा कमी तापमानात त्याच्या वाढीला प्रतिबंध होतो. वनस्पतीच्या श्वसनक्रिया, बाष्पीभवन, प्रकाशजन्य संयोग, अन्नद्रव्यांचे वहन आणि हालचाल इत्यादी जिवनकार्याच्या गोष्टी तापमानावर अवलंबून असतात. पिकांवर येणारे रोग, कीड यांच्या वाढीला विशिष्ट तापमान आवश्यक असतं. हे तापमान योग्य प्रमाणात नसेल तर रोग आणि किडींचा प्रादुर्भाव कमी प्रमाणात होतो. पिकांच्या फुलातील परागकणांची पक्वता, परागीकरण, फळधारणा या गोष्टीही तापमानावर अवलंबून असतात. सर्वात महत्त्वाचं म्हणजे वनस्पतीच्या प्रकाश संश्लेषण क्रियेसाठी प्रकाशाची गरज असते. दिवस मोठा तितक्या अधिक प्रमाणात पानातील प्रकाश संश्लेषण क्रिया घडते आणि वनस्पतीत अधिक प्रमाणात अन्न तयार होते. या साऱ्या बाबी लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी पीक लागवडीचं नियोजन करायला हवं. त्याचा निश्चित लाभ होऊ शकतो.

# फळपिकांचं उन्हाळ्यातील व्यवस्थापन

**कृषी वार्ता**

आता उन्हाळा सुरू झाला आहे. हवामानात अचानक बदल होत असला तरी यंदा उन्हाची तीव्रता अधिक राहण्याची चिन्हं आहेत. या दिवसात इतर काही महत्त्वपूर्ण पिकांप्रमाणेच फळबागांची योग्य काळजी घेणं महत्त्वाचं ठरतं. अन्यथा उत्पादनावर परिणाम होणं किंवा दर्जेदार उत्पादन न मिळणं अशा समस्यांना तोंड द्यावं लागतं. यामुळे नुकसानीचा सामना करावा लागतो. त्यामुळे काही बाबी लक्षात घ्याव्यात.

**द्राक्ष :** उन्हाळी हंगामात द्राक्ष पिकाचं अत्यंत महत्वाचं काम म्हणजे एप्रिल छाटणी किंवा खरड छाटणी होय. ही छाटणी एप्रिल महिन्याच्या सुरूवातीस करतात. यात फक्त खोड आणि ओलांडे वगळून बाकीचा सर्व भाग छाटून टाकतात. छाटणीनंतर काडयांची विरळणी करणे महत्त्वाचं आहे. हे करताना काडयांची वाढ, संख्या व जोमदारपणा यांचा विचार करावा. खोडावरील सुकलेली साल काढून खोडांवर व ओलांडयावर बोर्डोपेस्ट लावावी. त्याचप्रमाणे बागेवर येणाऱ्या उडद्या किडे, पिठया ढेकूण, फुलकिडे यांचा बंदोबस्त करावा. उन्हाळयात घड तपकिरी रंगाचे होतात. त्यामुळे अशा घडांना कृत्रिम सावलीची म्हणजेच शेडनेटची गरज असते.

**डाळींब :** आंबिया बहारासाठी पिकाचं नियोजन अत्यंत महत्वाचे असतं. त्यादृष्टीने फेब्रुवारी ते मे महिन्यात पिकास नियमित व एकसारखे पाणी देण्याकडे लक्ष द्यायला हवं. ठिबक सिंचनाद्वारे पूर्ण वाढलेल्या झाडास साधारणपणे फेब्रुवारीत २३ लि., मार्चमध्ये ३४ लि., एप्रिलमध्ये ४६ लि., तर मे महिन्यात ५० लिटर पाणी प्रती झाडास देणे आवश्यक असते. अन्यथा फुलगळीचं प्रमाण वाढून उत्पादनावर परिणाम होतो. झाडांखाली आच्छादन केल्यास ओलावा टिकून राहतो. या शिवाय झाडांवर फळांची संख्या योग्य ठेवावी. कीड आणि रोग नियंत्रणासाठी खोडावर गेरू + किटकनाशक + बुरशीनाशक यांची पेस्ट लावावी. किडींच्या नियंत्रणासाठी आंतरप्रवाही किटकनाशकांची आणि निंबोळी अर्क (४ टक्के) यांची आलटून पालटून फवारणी करावी. क्रिप्टोलेमस मॉन्टोझायरी हे परभक्षी किटक बागेत सोडावेत. कार्बेन्डेझीम ०.१ टक्के द्रावण ५ लि. प्रति झाडास द्यावं. एका महिन्यानंतर प्रति झाडास २५ ग्रॅम ट्रायकोडर्मा + पॅसिलोमायसिस + ५ किलो शेणखत यांचं मिश्रण करून खोडाजवळ द्यावं.

# यंदा आंब्याचं उत्पादन घटणार

**कृषी विशेष**

आता साऱ्यांनाच आंब्याच्या सिझनचे वेध लागले आहेत. आंब्याच्या मोहोराचा दरवळ सुखावणारा ठरत आहे. वरचेवर मागणीत होत असलेली वाढ आणि बऱ्यापैकी दराची हमी यामुळे आंब्याचं उत्पादन शेतकऱ्यांना हमखास उत्पन्न मिळवून देणारं ठरत आहे. आंब्याच्या निर्यातीलाही मोठ्या प्रमाणावर चालना दिली जात आहे. या काही महत्त्वाच्या बाबींमुळे आंब्याच्या लागवड क्षेत्रात वाढ होत आहे.ह्ह



या पार्श्वभूमीवर यावेळी हवामानामध्ये सतत बदल होत असल्यानं आंब्याचा मोहोर गळू लागला आहे. त्याच बरोबर झाडांवरील मोहोर काळपट होत असून कुजतही आहे. या समस्येमुळे यंदा आंब्याचं उत्पादन घटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आंबा पिकाचं उत्पादन कमी झाल्यास शेतकरी संकटात सापडणार आहेत. बिकट परिस्थितीत महत्त्वाचा आधार म्हणून आंबा पिकाकडं पाहिलं जातं; परंतु यावेळी हवामानातील बदल या पिकासाठी अडचणीचा ठरत आहे. काही दिवसांपूर्वी अचानक ढगाळ वातावरण तयार झालं होतं. काही ठिकाणी पाऊस झाला, तर काही ठिकाणी गारपीटही झाली. त्यानंतर उन्हाचा चटका वाढला. त्यातच आता पहाटे थंडी पडत आहे. अशा रितीने सतत बदलत्या हवामानाचा परिणाम आंब्याच्या झाडांवर दिसून येत आहे. राज्याच्या विविध भागात कमी–अधिक प्रमाणात आंब्याचं उत्पादन घेतलं जातं. हापूस, पायरी यांसारख्या आंब्याची लागवड केल्यानं शेतकरी वर्गाला आर्थिक पाठबळ मिळत आहे. शिवाय बरेचसे शेतकरी आंब्याची ठोक विक्री न करता किरकोळ विक्री करतात. यात आंब्याला चांगला दर मिळत असल्याचं या शेतकऱ्यांचं म्हणणं आहे. परंतु बदलत्या हवामानामुळं या वर्षी आंब्याचं उत्पादन कमी होण्याची शक्यता आहे. याचा परिणाम स्थानिक शेतकरी कुटुंबांवर होणार असून शेतकरी वर्गावर आर्थिक संकट कोसळणार आहे. कधी थंडी, कधी ऊन तर कधी ढगाळ वातावरण अशा संमिश्र हवामानाचा परिणाम आंब्यावर झाल्याचं दिसून येत आहे. त्यामुळे दरवर्षीच्या तुलनेनं आंब्याचं उत्पादन कमी मिळण्याची शक्यता आहे.


# असा डाउनलोड करा स्टेटस

**टेक नॉलेज**

**व्हॉट्स ॲपवरील स्टेटस फीचर खूपच लोकप्रिय झालं आहे. बरेच लोक खूप छान स्टेटस ठेवतात. हे स्टेटस तुम्ही डाउनलोड करू शकता. तसंच इतरांनाही पाठवू शकता.**

छोट्यांनो, व्हॉट्स ॲपवरील स्टेटस फीचर खूपच लोकप्रिय झालं आहे. बरेच लोक खूप छान स्टेटस ठेवतात. बरेचदा आपल्याला मित्रमैत्रिणींचं स्टेटस आवडतं. पण हे स्टेटस डाउनलोड करता येत नाही. मग आपण स्क्रीनशॉटवर समाधान मानतो. फोटोंचा स्क्रीनशॉट घेता येतो पण व्हिडिओचं काय? ते कसं डाउनलोड करायचं? पाहू या.

- गूगल प्ले स्टोअरमध्ये जाऊन 'फाईल्स बाय गूगल' हे ॲप डाउनलोड करा. यानंतर ॲप ओपन करा. इथे कोपऱ्यात मेनूचा पर्याय दिसेल. इथे सेटिंग्जमध्ये जा.
- इथे तुम्हाला 'शो हिडन फाईल्स'चा पर्याय दिसेल. हा पर्याय सुरू करा. यानंतर 'बॅक' करा. इथे खालच्या बाजूला ब्राऊज ऑप्शन दिसेल. त्यावर टॅप करा.
- आता एक पेज ओपन होईल. तिथे 'इंटर्नल स्टोरेज' ऑप्शनवर क्लिक करा. यानंतर खालच्या बाजूला स्क्रोल करून व्हॉट्स अप ऑप्शन्समध्ये जा. इथे 'मीडिया ऑप्शन'वर टॅप करा.
- इथे स्टेटस फोल्डर असेल. या फोल्डरमध्ये सगळ्या फ्रेंड्सचे स्टेटस दिसतील.
- हे स्टेटस तुम्ही डाउनलोड करू शकता. तसंच इतरांनाही पाठवू शकता.




# वाहतुकीची भन्नाट साधनं

**फन टाईम**

मित्रमैत्रिणींनो, वाहतुकीची बरीच साधनं आहेत. एखाद्या ठिकाणी लवकर पोहोचायचं असेल तर तुम्ही विमानाने जाऊ शकता. ट्रेन, टॅक्सी, मेट्रो, बस अशा विविध माध्यमांद्वारे तुम्ही प्रवास करू शकता. जगभरातही अशी अनेक साधनं आहेत. प्रत्येक देशाचं एक वेगळेपण आहे. वाहतुकीच्या अशाच काही भन्नाट पर्यायांविषयी...

- क्युबामध्ये कोको टॅक्सी चालवली जाते. कोको टॅक्सी काळ्या आणि पिवळ्या रंगाची असते. पिवळ्या रंगाची टॅक्सी पर्यटकांसाठी तर काळ्या रंगाची टॅक्सी स्थानिकांसाठी असते. या टॅक्सीचा आकार नारळाच्या करवंटीसारखा असतो. त्यामुळे या टॅक्सीला कोको टॅक्सी हे नाव पडलं.
- व्हिएतनाममध्ये सायक्लो रिक्षा खूप लोकप्रिय आहे. भारतातल्या अनेक शहरांमध्ये सायकल रिक्षा पहायला मिळतात. सायक्लो हा तसाच एक प्रकार आहे. सायक्लो ही तीन पायांची सायकल आहे. ही सायकल खूपच अनोखी आहे. याच्या पुढच्या बाजूला प्रवाशांसाठी आसन असतं तर मागच्या बाजूला चालक बसतो. व्हिएतनाममध्ये भटकंतीसाठी या सायकल रिक्षाने फिरता येतं.
- पोर्तुगालमध्ये मोंटे टोबोग्गन नावाचं एक साधन आहे. इथल्या मदिरा बेटांवर त्यांचा वापर होतो. मोंटे टोबोग्गन बनवण्यासाठी लाकूड आणि वेताचा वापर केला जातो. डोंगरावरून खाली येण्यासाठी मोंटे टोबोग्गनचा वापर केला जातो. इथल्या नागमोडी रस्त्यांवर प्रवास करण्यासाठी हे अत्यंत उपयुक्त साधन ठरतं.
- जर्मनीमधल्या वुपरटल शहरात जवळपास ३९ फूट उंचीवर सस्पेन्शन मोनोरेल तयार करण्यात आली आहे. ही मोनोरेल म्हणजे वाहतुकीचं अनोखं साधन आहे. या मोनारेलचे डबे आणि स्थानकं बनवण्यासाठी जवळपास १९,२०० टन स्टील वापरण्यात आलं आहे. ही मोनोरेल जर्मनीमध्ये १९०१ पासून सुरू आहे. संपूर्ण शहरात मोनोरेलची २० स्थानकं आहेत.
- कंबोडियामधली बांबू ट्रेन खूपच प्रसिद्ध आहे. ही ट्रेन ३.७ किलोमीटरचं अंतर कापते. यासाठी २० मिनिटं लागतात. या ट्रेनला डबे किंवा इंजिन नाही. ती बांबूपासून तयार करण्यात आली आहे. या ट्रेनमध्ये बसायची मजाच वेगळी!






# विमानाचा रंग पांढराच का?

**असं का?**

मुलांनो, तुम्ही विमानात बसला आहात का? विमानात बसला नसाल तरी तुम्ही विमान तर बघितलंच असेल. प्रत्येक विमानाचा रंग हा पांढराच असतो. विमान कोणत्याही कंपनीचं असलं तरी त्याला दुसरा रंग दिला जात नाही. असं का बरं होत असावं? विमानाला पांढऱ्याशिवाय दुसरा रंग का बरं दिला जात नसावा? यामागे बरीच कारणं आहेत. पण विमान थंड रहावं म्हणून त्याला पांढरा रंग दिला जातो. विमान आकाशात उडतं. त्यावर सूर्याची किरणं पडत असतात. पांढरा रंग शीतल असतो. हा रंग सूर्याची उष्णता कमी प्रमाणात शोषून घेतो. म्हणूनच उन्हाळ्यात पांढरे किंवा फिकट रंगाचे कपडे घालण्याचा सल्ला दिला जातो. त्या धर्तीवर विमान थंड रहावं म्हणून पांढऱ्या रंगाचा वापर केला जातो.




विमानाला पांढरा रंग देण्याचं अजून एक महत्त्वाचं कारण म्हणजे इतर रंग दिले तर विमान कंपन्यांना भरपूर पैसे द्यावे लागतात. त्या तुलनेत पांढरा रंग कमी खर्चात देता येतो. यामुळे कंपनीचे पैसेही वाचतात. तसंच पांढरा रंग द्यायला फार वेळही लागत नाही. इतर रंग द्यायला वेळही जास्त लागतो. या गोष्टींचा विचार करून विमानाला पांढरा रंग दिला जातो.



# बीएस म्हणजे काय?

**जाणून घ्या**

दोस्तांनो, तुम्ही बी ६ इंजिनाबद्दल ऐकलं असेल. नव्या वाहनांमध्ये बी ६ इंजिन बसवलं जातं. प्रदूषणाचं प्रमाण कमी करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. मध्यंतरी बीएस ४ इंजिनाच्या बाबतीतही असाच निर्णय घेण्यात आला. ३१ मार्च २०२० नंतर बीएस ४ इंजिनवाल्या गाड्यांची विक्री करता येणार नाही, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. म्हणूनच आता या इंजिनबाबत चर्चा सुरू झाली आहे. बीएस ४ इंजिन म्हणजे नेमकं काय हे जाणून घेऊ.

बीएस म्हणजे भारत स्टेज. हे एक परिमाण आहे. भारतात गाड्यांच्या माध्यमातून होणाऱ्या प्रदूषणाचं मोजमाप बीएस या परिमाणाने केलं जातं. हे मानक भारत सरकारनेच तयार केलं आहे. बीएस ३, बीएस ४, बीएस ५, बीएस ६ अशी मानकं निश्चित करण्यात आली आहेत. बीएस ६ इंजिनमधून कार्बनचं उत्सर्जन कमी प्रमाणात होतं. बीएसच्या पुढचा आकडा जेवढा मोठा तेवढं ते इंजिन सुरक्षित किंवा कमी प्रदूषण करणारं मानलं जातं. एक एप्रिलपासून बीएस ६ इंजिनं बंधनकारक करण्यात आली आहेत. त्यामुळे आता वाहन कंपन्या बीएस ६ इंजिनवाल्या वाहनांची निर्मिती करू लागली आहेत.

# व्हिएफएक्सची मस्त दुनिया

**कोण होणार?**


चित्रपट, गेम्स तसंच विविध ॲप्समध्ये विज्युअल इफेक्ट्सचा वापर केला जातो. व्हीएफएक्स तंत्रज्ञानाचा वापर करून दृश्यं तयार केली जातात. व्हीएफएक्सला असलेली वाढती मागणी लक्षात घेता तुम्ही व्हीएफएक्स तंत्रज्ञ म्हणून काम करू शकता. या क्षेत्राविषयी...

व्हीएफएक्स तंत्रज्ञानाचे तीन, सहा आणि १२ महिन्यांचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. काही संस्थांमध्ये दोन वर्षांचा डिप्लोमा अभ्यासक्रमही चालवला जातो. व्हिडिओ प्रोडक्शन, ग्राफिक डिझाइन, मोशन ग्राफिक्स, कॅमेरा ट्रॅकिंग, फिल्म रिस्टोरेशन अशी तंत्रं शिकवली जातात. या क्षेत्रात करीअर करण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या शिक्षणाची आवश्यकता नसते. बारावी किंवा पदवीनंतर तुम्ही या अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ शकता. कॉम्प्युटरचं ज्ञान असेल तर या क्षेत्रात जास्त चांगली प्रगती करता येईल.

व्हीएफएक्स तंत्रज्ञानाशी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण करून चित्रपट, मालिका, ॲनिमेशन, व्हिडिओ गेम्स, ॲप्स, व्हिडिओ, जाहिराती तसंच मनोरंजन क्षेत्राशी संबंधित इतर क्षेत्रांमध्ये तुम्ही काम करू शकाल. माध्यमक्षेत्रात ग्राफिक डिझायनर तसंच व्हीएफएक्स तंत्रज्ञांना बरीच मागणी आहे. आज या क्षेत्रात महानगरांसोबतच छोट्या शहरांमध्येही बऱ्याच संधी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे काही तरी वेगळं करायचं असेल तर व्हीएफएक्सच्या क्षेत्रात काम करायला हरकत नाही.



**ठिपके जुळवा**



# असे आहेत गार्बेज कॅफे

**गंमत ग्यान**

आपण आपला देश स्वच्छ ठेवायला हवा. नागरिकशास्त्रात आपण आपली कर्तव्यं शिकतो. पण ही कर्तव्यं पार पाडतो का? रस्त्यावर कचरा न करणं हे आपलं कर्तव्यच आहे. प्लास्टिकमुळे पर्यावरणाचं बरंच नुकसान होत आहे. म्हणूनच या कचऱ्याचं प्रमाण कमी करण्यासाठी विविध शहरांमध्ये गार्बेज कॅफे ही संकल्पना राबवली जात आहे. चला तर मग, गार्बेज कॅफे म्हणजे नेमकं काय हे जाणून घेऊ.

- जुलै २०१९ मध्ये देशातला पहिला गार्बेज कॅफे सुरू करण्यात आला. हा कॅफे छत्तीसगडमध्ये सुरू झाला. या कॅफेमध्ये प्लास्टिकचा कचरा दिल्यानंतर गरीबांना अन्नदान केलं जातं. एक किलो प्लास्टिक आणणाऱ्यांना पोटभर जेवण दिलं जातं तर अर्धा किलो प्लास्टिक आणणाऱ्यांना नाश्ता दिला जातो. हे सर्व प्लास्टिक रस्ता तयार करण्याच्या कामासाठी वापरलं जात आहे.
- गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात दिल्लीमध्ये गार्बेज कॅफे सुरू झाला. इथेही प्लास्टिकचा कचरा दिल्यानंतर पोटभर जेवण दिलं जातं. द्वारका परिसरातल्या एका मॉलमध्ये हा गार्बेज कॅफे आहे. इथे प्लास्टिकचा कचरा दिल्यानंतर आवडत्या रेस्टॉरंटमध्ये जेवता येतं. प्लास्टिकच्या वजनानुसार लोकांना कूपन दिलं जातं.
- गुजरातमधल्या दाहोदमध्ये देशातला तिसरा गार्बेज कॅफे सुरू करण्यात आला. इथे अर्धा किलो प्लास्टिक देणाऱ्यांना चहा तर एक किलो प्लास्टिक देणाऱ्यांना नाश्ता दिला जातो.

या सगळ्या प्लास्टिकचा वापर रस्ते बांधण्यासाठी केला जाणार आहे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशनने अशा प्लास्टिकचा वापर करून रस्ता बांधला आहे.





# गूगलच्या हटके ट्रिक्स

**व्हॉट्स न्यू?**

दोस्तांनो, गूगलवर काही गमतीजमती करता येतात. यामुळे गूगलचा लूक थोडाफार बदलू शकतो.

- बॅरेल रोल ही गूगलची एक गंमत आहे. यासाठी गूगलचं होम पेज ओपन करा. 'डू अ बॅरेल रोल' टाईप करा. मग सर्च ऑप्शनवर क्लिक केल्यानंतर गूगलचं पेज दोन वेळा फिरेल.
- गूगलवर askew टाईप करून एंटर करा. यानंतर गूगलचं होमपेज थोडं तिरकं दिसेल. हे खूपच गमतीशीर आहे.
- गूगलमध्ये जाऊन गूगल ग्रॅव्हिटी टाईप करा. यानंतर 'आय ॲम फिलिंग लकी'वर टॅप केल्यानंतर गूगल पेज बदलून जाईल. गूगल पेज उलटं दिसू लागेल.
- तुमच्यातले काहीजण मार्व्हेलचे फॅन असू शकतात. मार्व्हेलचे फॅन्स गूगलमध्ये 'थानोस' असं टाईप करू शकतात. यानंतर उजव्या बाजूला 'गाउंटलेट' आयकॉन दिसेल. त्यावर टॅप करा. यानंतर गूगलवरची अक्षरं दिसेनाशी होतील.
- आता तुम्ही गूगलवर 'झर्ग रश' टाईप करून 'आय ॲम फिलिंग लकी'वर क्लिक करा. यानंतर तुमच्यासमोर गूगलचं पेज ओपन होईल. मग शून्यं दिसू लागतील. ती वरून खाली पडताना दिसतील. हे खूपच गमतीदार दिसतं.





## ओळखा पाहू

**जिज्ञासा**

१) कोणत्या शहराला भारताचं पॅरिस असं म्हटलं जातं?
२) तेलगू ही कोणत्या राज्याची राज्यभाषा आहे?
३) बांगलादेशचं चलन कोणतं?
४) होम पेज म्हणजे काय?
५) चंडीगडचं रॉक गार्डन कोणी तयार केलं?
६) मेसापोटामिया हे कोणत्या देशाचं जुनं नाव आहे?
७) एलिफंट फॉल्स कोणत्या राज्यात आहे?
८) 'वॉर अँड पीस' या कादंबरीचे लेखक कोण?
९) २०२० चा महिलांचा टी-२० विश्वचषक कोणत्या देशाने जिंकला?
१०) केरळची राजधानी कोणती?

उत्तरं : १) जयपूर २) आंध्र प्रदेश ३) टका ४) कोणत्याही वेबसाईटचं मुख्य पान ५) नेकचंद ६) इराक ७) मेघालय ८) लियो टॉलस्टॉय ९) ऑस्ट्रेलिया १०) थिरूअनंतपुरम

**दोस्त हे मस्त**


## दणकट याक



दोस्तांनो, वाळवंटात वाहतुकीसाठी उंटांचा वापर होतो. त्याचप्रमाणे बर्फाळ प्रदेशात याक हा प्राणी असतो. याक हा गाय, बैलांसारखाच दिसतो. मात्र त्याच्या अंगावर खूप केस असतात. याक शाकाहारी प्राणी आहे. तो गवत खातो तसंच भरपूर पाणी पितो. पाळीव याक शेतात राबतात. याकची शिंगं दणकट आणि टोकदार असतात. खूप थंडी पडल्यावर याक आपल्या शिंगाने बर्फ खणून गवत खातो. याक अत्यंत धिप्पाड असा प्राणी आहे. बर्फाळ प्रदेशातले लोक याकचं दूध पितात. याकच्या दुधापासून तयार करण्यात आलेलं पनीर आणि चीज लवकर खराब होत नाही.

**खादाडी**

## चमचमीत व्हेज टॅकोज



मुलामुलींनो, तुम्हाला छान चविष्ट पदार्थ खायला खूप आवडतात ना? तुम्ही मस्तपैकी व्हेज टॅकोज बनवून बघा. यासाठी चार टॅकोज, एक कप उकडलेला राजमा, दोन चमचे टोमॅटो प्युरी, मीठ, एक कांदा, दोन चमचे तेल, टोमॅटो आणि कोथिंबिर असं साहित्य घ्या. एका कढईत थोडं तेल गरम करा. यात कांदा, राजमा, मीठ, टोमॅटो प्युरी घालून मिक्स करा. मॅशरने हे मिश्रण मॅश करून घ्या. त्यानंतर त्यात थोडी साखर, हिरवी मिरची, चिली फ्लेक्स आणि कोथिंबिर घालून शिजवून घ्या. हे सगळं शिजवलेलं मिश्रण टॅकोजमध्ये घाला. वरून चिरलेला कांदा, टोमॅटो आणि कोथिंबिर घालून सजवा. मस्तपैकी खा.

**स्टडी टिप्स**

## नवे मित्रमैत्रिणी जोडा




मुलामुलींनो, तुम्ही वेगवेगळ्या शिकवणी वर्गांना जात असाल. शाळेत तुमचे मित्र-मैत्रिणी असतीलच. पण या क्लासमध्येही मुलामुलींशी बोला. त्यांच्याशी मैत्री करा. यामुळे एखादा मुद्दा समजला नाही तर तुम्ही त्यांच्याशी चर्चा करू शकता. काही कारणामुळे क्लास बुडवावा लागला तर त्यांच्याकडून नोट्स घेऊ शकता. परीक्षेच्या काळात एकत्र अभ्यास करू शकता. एकत्र अभ्यास केल्यामुळे विषय समजून घेणं सोपं होतं आणि हसत-खेळत छान अभ्यासही होतो.

**योगा टाईम**

## करा शलभासन

छोट्यांनो, आपलं शरीर लवचिक असायला हवं. शरीर लवचिक नसेल तर खेळताना, व्यायाम करताना त्रास होऊ शकतो. शरीर लवचिक बनवण्यासाठी तुम्ही शलभासन करू शकता. हे आसन खूप सोपं आहे. यामुळे शरीर लवचिक होतंच शिवाय कंबरेचे स्नायू बळकट होतात. या आसनामुळे पचनशक्ती सुधारते. त्यामुळे हे आसन खूपच उपयुक्त ठरू शकतं.



हिंदुस्थान साहित्य मैफल



## तो निरागस भाव...

*शेतात स्वच्छंदीपणे बागडणाऱ्या या कोकरालाही फुलांच्या गंधाचा मोह पडला असावा! मग एक क्षण तेही थांबलं, त्याने या गंधात आपलं मन गुंतवलं. पिवळ्या फुलांसोबत हे पांढरं कोकरू खरंच खूप सुंदर दिसतंय...*



## माता ना मढमध्ये मंगळासारखं वातावरण

मंगळ ग्रहाबद्दल मानवाला प्रचंड आकर्षण आहे. म्हणूनच मंगळाच्या पृष्ठभागावर बरंच संशोधन केलं जात आहे. नासा या अमेरिकेच्या अवकाश संशोधन संस्थेसह इस्रोनेही मंगळावर यान धाडलं. मंगळावर संशोधन सुरू आहेच. पण आता आपल्या पृथ्वीवर मंगळाच्या पृष्ठभागासारखं वातावरण असणारी जागा सापडली आहे. ही जागा आपल्या भारतात आहे. गुजरातमधल्या कच्छ परिसरातल्या 'माता ना मढ' इथे मंगळाच्या पृष्ठभागासदृश जागा आढळली आहे. यामुळे बऱ्याच शास्त्रज्ञांनी इथे धाव घेतली आहे. मंगळाशी साधर्म्य साधणारं हे जगातलं एकमेव ठिकाण असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. इस्रो, आयआयटी खरगपूर आणि हैदराबाद इथलं जियोफिजिकल रिसर्च सेंटर या भागात एकत्रितपणे संशोधन करणार आहे. माता न मढचा अभ्यास खगोलशास्त्रज्ञांसाठी बराच उपयुक्त ठरणार असल्याचं मत आयआयटी खरगपूरच्या भूविज्ञान विभागाचे प्रमुख प्रा. साईबल गुप्ता यांनी व्यक्त केलं आहे. यामुळे नासा आणि इस्रोला मंगळ यान मोहिमेदरम्यान यान उतरवण्याचं ठिकाण निश्चित करणं सोपं जाईल, असं त्यांचं म्हणणं आहे. माता न मढची दखल अमेरिकन शास्त्रज्ञांनीही घेतली आहे. इथल्या वॉशिंग्टन विद्यापीठातले शास्त्रज्ञ अधिक संशोधन करण्यासाठी भारतात दाखल झाले आहेत. इथल्या जमिनीत जॅरोसाईट हा घटक आढळला आहे. जॅरोसाईट मंगळाच्या पृष्ठभागावर सापडतो. म्हणूनच मंगळ ग्रहावरच्या वातावरणाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने या जागेचं संशोधन उपयुक्त ठरणार आहे. मंगळ ग्रहावरच्या पाण्याच्या अस्तित्वाचाही यानिमित्ताने आढावा घेता येणार आहे.



## आदित्यची मॅरेथॉन धाव

भारताच्या आदित्य राजने जबरदस्त कामगिरी करून दाखवली आहे. आदित्यने वर्ल्ड मॅरेथॉन चॅलेंज पूर्ण केलं आहे. अशी कामगिरी करणारा तो पहिलाच भारतीय आहे. तो सात दिवसांमध्ये सात खंडांमधल्या सात मॅरेथॉन स्पर्धांमध्ये सहभागी झाला. आदित्य गुरूग्रामचा रहिवासी आहे. दक्षिण आफ्रिकेतल्या केपटाउनमधल्या मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी होऊन त्याने या चॅलेंजला सुरूवात केली तर अमेरिकेतल्या मियामीमध्ये तो अखेरची मॅरेथॉन धावला. दरम्यानच्या काळात त्याने अंटार्क्टिका, ऑस्ट्रेलिया, आशिया, युरोप आणि दक्षिण अमेरिका खंडातल्या मॅरेथॉन पूर्ण केल्या. या मॅरेथॉन चॅलेंजमध्ये ४७ खेळाडू सहभागी झाले होते. त्यात ३२ पुरुष आणि १५ महिलांचा समावेश होता. मॅरेथॉन स्पर्धा पूर्ण करण्यासाठी १६८ तास दिले जातात. आदित्यने १६४ तासांमध्येच मॅरेथॉन स्पर्धा पूर्ण केल्या. मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ३२ लाख रुपये खर्च करावे लागले. आदित्य विविध खंडांमधल्या मॅरेथॉनमध्ये धावला. या काळात त्याला उणे ३० अंश सेल्सियसपासून ३६ अंश सेल्सियसपर्यंत वेगवेगळ्या वातावरणात धावावं लागलं. ही स्पर्धा दर वर्षी आयोजित केली जाते. त्यात जगातले आघाडीचे धावक सहभागी होतात. फक्त सात दिवसात सात खंडांमध्ये फिरावं लागतं. हा काळ खूप थकवणारा असतो, असं आदित्य सांगतो. अंटार्क्टिकामध्ये उणे ३० अंश तापमानात धावावं लागलं. इथे ५० ते ६० किलोमीटर प्रति तास एवढ्या वेगाने वारे वाहत होते. या दरम्यान श्वास घ्यायला बराच त्रास होतो. या आव्हानाचा सामना करण्यासाठी शरीरासोबतच मन सक्षम असणंही गरजेचं आहे, असं आदित्य म्हणतो.

## भलतीच भाषा बोलणारं गाव!


हिमाचल प्रदेशमधलं एक गाव खूपच अनोखं आहे. इथले लोक वेगळ्याच भाषेत बोलतात. मलाणा असं या गावाचं नाव आहे. हिमालयात वसलेल्या या गावाच्या चारही बाजूंना खोल दऱ्या आणि बर्फाच्छादित शिखरं आहेत. या गावात १७०० लोक राहतात. हे गाव पर्यटकांमध्ये बरंच लोकप्रिय आहे. मलाणापर्यंत पोहोचणं सोपं नाही. इथे जाण्यासाठी सरळ रस्ता नाही. डोंगरदऱ्यांमधून वाट काढत जावं लागतं. पार्वती खोऱ्याच्या तळाशी असणाऱ्या जरी नावाच्या गावातून मलाणाला जाता येतं. जरीहून मलाणाला जाण्यासाठी चार तास लागतात. इथले लोक स्वत:ला सिकंदराचे वंशज मानतात. जग जिंकण्यासाठी



निघालेल्या सिकंदराने भारतावर हल्ला केला होता. त्यावेळी त्याचे काही सैनिक या गावात आले होते. त्यानंतर हे सैनिक इथून गेलेच नाहीत. ते इकडचेच झाले. आपण सिकंदराच्या याच सैनिकांचे वंशज आहोत, असं इथल्या लोकांचं म्हणणं आहे. पण अद्याप हे पूर्णपणे सिद्ध झालेलं नाही. सिकंदराच्या काळातल्या काही वस्तू या गावात सापडल्या आहेत. सिकंदराच्या काळातली एक तलवार याच गावातल्या एका मंदिरात असल्याचं बोललं जातं. इथले लोक कनाशी नामक भाषा बोलतात. ही भाषा जगातल्या कोणत्याही भागात बोलली जात नाही. या भाषेच्या उत्पत्तीबाबत संशोधन सुरू आहे. ही भाषा बाहेरच्या लोकांना शिकवली जात नाही. इथले लोक जमलू नामक देवतेची पूजा करतात. ही जमलू देवता म्हणजे जमदग्नी ऋषी. इथे जमलू देवता आणि त्यांची पत्नी रेणुकेचं मंदिरही आहे.

## या कुंडाची खोली किती?

भारतात असंख्य कुंड आहेत. काही कुंडांमधून गरम पाण्याचे झरे वाहत असतात. काही कुंडांमध्ये आंघोळ केल्यानंतर त्वचारोग बरे होत असल्याचा दावा केला जातो. अशाच एका कुंडाचं गुपित अजूनही उलगडलेलं नाही. हे कुंड म्हणजे भीमकुंड. या कुंडाची खोली किती हे कोणालाही माहीत नाही. भीमकुंडाची खोली अजूनही कोणाला मोजता आलेली नाही. याबद्दल फक्त अंदाजच बांधले जात आहेत. हे कुंड मध्य प्रदेशमधल्या छतरपूर जिल्ह्यापासून जवळपास ७० किलोमीटर दूर असणाऱ्या बाजना नामक गावात आहे. या कुंडाचा संबंध महाभारताशी जोडण्यात आला आहे. महाभारतात पांडव अज्ञातवासात होते. वेगवेगळे वेष करून इतस्त: भटकत होते. त्यावेळी त्यांना प्रचंड तहान लागली. मग भीमाने आपल्या गदेने जमीन खोदली आणि हे कुंड तयार केलं. या कुंडाचा आकार गदेसारखाच असल्याचं लोकांचं म्हणणं आहे. हे कुंड ४० ते ८० मीटर रूंद आहे. वरून साध्या दिसणाऱ्या या कुंडात बरीच रहस्यं दडली आहेत. हे कुंड एखाद्या नैसर्गिक आपत्तीबाबत सजग करत असल्याचंही सांगितलं जातं. आशिया खंडात भूकंप, सुनामीसारख्या घटना



होणार असतील तर कुंडातलं पाणी वाढू लागतं. स्थानिक प्रशासनापासून नासाच्या शास्त्रज्ञांपर्यंत अनेकांनी या कुंडाची खोली जाणून घेण्यासाठी बरेच प्रयत्न केले. पण कोणालाही काहीही मिळलं नाही. इथले लोक या कुंडातलं पाणी गंगेच्या पाण्याइतकं पवित्र असल्याचं मानतात.


## हात नसले तरी...


हातांशिवाय गाडी चालवता येईल का? बहुतेकजण या प्रश्नाचं उत्तर नकारार्थीच देतील. पण हात नसतानाही गाडी चालवता येऊ शकते. केरळच्या जिलुमल मेरियट थॉमस या २८ वर्षीय तरुणीने ही अशक्य गोष्ट शक्य करून दाखवली आहे. तिला आता आरटीओ विभागाकडून परवानाही मिळाला आहे. हात नसतानाही गाडी चालवणारी जिलुमल ही देशातली पहिलीच महिला वाहनचालक आहे. ती गाडी




चालवण्यासाठी पायांचा वापर करते. जिलुमलला थॅलिडोमाइड सिंड्रोम आहे. या आजारात मुलांच्या हातापायांचा विकास होत नाही. जिलुमलला गाडी चालवण्याची खूप आवड होती. ती ग्राफिक डिझायनर आहे. तिचे वडील शेतकरी तर आई गृहिणी आहे. डिझायनिंगचं काम करत असतानाच ती एर्नाकुलम यंग वूमन्स ख्रिश्चन असोसिएशची सदस्य बनली. या संस्थेतच तिने गाडी चालवण्याचे धडे घेतले. त्यानंतर २०१४ मध्ये तिने परवान्यासाठी अर्ज केला. पण आरटीओने हात नसल्यामुळे तिला परवाना द्यायला नकार दिला. पण जिलुमल शांत बसली नाही. गाडी चालवणं हे तिचं स्वप्न होतं आणि हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ती काहीही करायला तयार होती. आरटीओच्या या निर्णयाला तिने उच्च न्यायालयात आव्हान दिलं. उच्च न्यायालयाने जिलुमलची बाजू उचलून धरली आणि तिला शिकाऊ परवाना देण्याचा आदेश दिला. आपल्या देशात हात नसलेला पुरुष वाहनचालक आहे. जिलुमलने त्याची माहिती न्यायालयात सादर केली. तसंच हात नसूनही गाडी चालवणाऱ्या ऑस्ट्रेलियन महिलेचा व्हिडिओही न्यायालयात सादर केला. तिने २०१८ मध्ये गाडी खरेदी केली. ही गाडी स्वयंचलित असून आरटीओची मार्गदर्शक तत्त्वं आणि जिलुमलच्या गरजेनुसार ती तयार करण्यात आली आहे.

## ज्वालामुखीचेही भय नाही...







ज्वालामुखी म्हटल्यावर आपल्याला धडकीच भरते. त्यातच जिवंत ज्वालामुखी म्हणजे आगीचा तप्त गोळाच. यातून लाव्हारस कधी बाहेर पडेल याचा काहीच नेम नसतो. अशा ज्वालामुखीच्या जवळ जायलाही कोणी धजावणार नाही. पण हे जग अवलिये, धाडसी लोकांनी भरलेलं आहे. अमेरिकेच्या ४१ वर्षीय निक वालेंडाने निकारागुआ इथल्या मसाया नावाच्या जिवंत ज्वालामुखीवरून रोप वॉक केला. म्हणजे या ज्वालामुखीवर बांधलेल्या दोरीवरून तो चालत गेला. छोटीशी चूक निकला मृत्यूच्या दाढेत ढकलणारी ठरली असती. निकच्या या स्टंटबाजीसाठी ज्वालामुखीच्या क्रेटर माउथ ऑफ हेलपासून १८०० फूट उंचीवर दोरी बांधण्यात आली होती. ज्वालामुखीमधून लाव्हारस आणि घातक असे वायू बाहेर पडत असतात. त्यामुळे जिवंत ज्वालामुखीच्या आसपास राहणंही धोक्याचं ठरतं. हे माहीत असूनही निकने हा धोका पत्करला आणि विक्रमाची नोंद केली. ज्वालामुखीतून निघणाऱ्या हानिकारक हवेपासून बचाव करण्यासाठी निकने गॅस मास्क, हार्नेस आणि चष्मा लावला होता. ज्वालामुखीतून निघणाऱ्या उष्णतेचा सामना करण्यासाठी निकने विशिष्ट प्रकारचे बूटही घातले होते. हा स्टंट करताना जोरदार वारे वाहत होते. निक हा अमेरिकेतल्या अत्यंत प्रसिद्ध फ्लाईंग वालेंडा सर्कस कुटुंबाच्या सातव्या पिढीचा कालाकार आहे. निकने याआधीही रोप वॉक केला आहे. त्याने आणि त्याच्या बहिणीने मिळून टाईम्स स्क्वेअरवर २५ मजल्यांच्या इमारतीच्या वर दोरी बांधून रोप वॉक केला होता. ज्वालामुखीवरून चालण्याच्या निकच्या धाडसाचं प्रचंड कौतुक होत आहे.



## या शास्त्रज्ञांची अंगं आहेत सुरक्षित!

या जगात अनेक महान शास्त्रज्ञ होऊन गेले. या शास्त्रज्ञांनी लावलेल्या शोधांमुळे आपलं जीवन सुकर झालं आहे. म्हणूनच आठवण म्हणून जगातल्या तीन महान शास्त्रज्ञांच्या शरीराचा भाग आजही जपून ठेवण्यात आला आहे. गॅलिलिओ गॅलिलिने दुर्बिणीचा शोध लावला. गॅलिलीचं बोट, पाठीच्या कण्याचं हाड आणि अंगठा इटलीमधल्या फ्लोरन्स शहरातल्या संग्रहालयात सुरक्षित ठेवण्यात आला आहे. १७३७ मध्ये त्यांचं शव एका कबरीतून दुसऱ्या कबरीकडे आणत असताना कोणी तरी त्यांची ही अंगं काढून घेतली. अल्बर्ट आईन्स्टाईन हे अत्यंत महान व्यक्तिमत्त्व. आईन्स्टाईनच्या मृत्यूनंतर त्यांचे डोळे काढून न्यूयॉर्कमध्ये सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात आले. इतकंच नाही तर, त्यांचा मेंदूही काढण्यात आला होता. त्यांच्या मेंदूवर अनेक शास्त्रज्ञांनी संशोधन केलं आहे. थॉमस एडिसनने बल्ब, फोनोग्राफ आणि कॅमेऱ्याचा शोध लावला. एडिसन यांच्या अंगाचा भाग नाही तर त्यांनी घेतलेल्या शेवटच्या श्वासाची हवा जपून ठेवण्यात आली आहे. हे ऐकून कोणालाही आश्चर्य वाटेल. म्हणजेच एडिसनचा श्वास आजही अस्तित्वात आहे! हा श्वास एका शोधनळीत सुरक्षित आहे. हा श्वास मिशिगन शहरातल्या एका संग्रहालयात आहे.





## खऱ्या अर्थाने महिला राज

महिला सक्षमीकरणाबाबत बरेचदा बोललं जातं. अनेक देशांमध्ये महिलांवर अत्याचार होतात. अनेक ठिकाणी पुरुषप्रधान संस्कृती पहायला मिळते. नाही म्हणायला काही भागांमध्ये मातृसत्ता आहे. अनेक देशांमध्ये महिला आजही आपल्या हक्कांसाठी झगडत आहेत. पण एका देशात महिला पुरुषांना गुलाम बनवतात. या देशात पुरुषांना माणसाप्रमाणेही वागवलं जात नाही. त्यांना प्राण्यांप्रमाणे वागणूक दिली जाते. 'वूमन ओव्हर मेन' हेच या देशाचं घोषवाक्य आहे. इथे महिला पुरुषांना आपल्या मर्जीनुसार वागवतात. पृथ्वीतलावर असा देश अस्तित्वात आहे, हे ऐकून अनेकांना धक्का बसेल. 'अदर वर्ल्ड किंगडम' असं या देशाचं नाव आहे.




१९९६ मध्ये झेक प्रजासत्ताकमधल्या एका राज्याने स्वत:ला स्वतंत्र देश म्हणून घोषित केलं. पॅट्रिशिया १ ही या देशाची राणी आहे. संपूर्ण देशात तिचीच सत्ता चालते. ब्लॅक सिटी ही या देशाची राजधानी आहे. मात्र या राज्याला देश म्हणून अधिकृत मान्यता मिळालेली नाही. असं असलं तरी या देशाचा स्वतंत्र झेंडा आहे. इथे वेगळी पोलीस यंत्रणा आहे. महिलाच या देशाच्या मूळ नागरिक आहेत. या देशाच्या निर्मितीसाठी दोन दशलक्ष डॉलर्स खर्च करण्यात आले. राणी पॅट्रिशियालाच देशाच्या नियमांमध्ये बदल करण्याचा अधिकार आहे. या देशाचं नागरिकत्त्व मिळवण्यासाठी तिने काही नियम तयार केले आहेत. या देशाचं नागरिकत्त्व मिळवणाऱ्या महिलेने इथले सगळे नियम पाळणं गरजेचं असतं. तिच्याकडे एक पुरुष नोकर म्हणून कामाला हवा. नागरिकत्त्व मिळवण्यासाठी तिने अर्ज करावा लागतो. नागरिकत्त्व मिळवण्यासाठी महिलांना पाच दिवस राणीसोबत रहावं लागतं. महिला राज असणारा हा देश अनोखाच म्हटला पाहिजे...

## आकाशात सापडला खजिना!

अंतराळ हे एक गूढ आहे. अंतराळात अनेक गोष्टी दडल्या आहेत. नासा, इस्रोसारख्या संघटना हे गूढ उलगडण्याच्या प्रयत्नात असतात. यातच त्यांना वेगळं काही तरी गवसतं. अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था नासाला अंतराळात खूप मोठा खजिना मिळाला आहे. या खजिन्याचं मूल्य खूप मोठं आहे. हा खजिना पृथ्वीवरच्या लोकांना वाटला तर प्रत्येकजण अब्जाधीश होईल, असं बोललं जात आहे. नासाला नेमकं मिळालंय तरी काय? जाणून घेऊ. नासाला अंतराळात लोखंडाचं भांडार सापडलं आहे. हे लोखंडाचं भांडार म्हणजे क्षुद्रग्रह आहे. या ग्रहाला '१६ सायकी' हे नाव देण्यात आलं आहे. हा क्षुद्र ग्रह लोखंडाचा आहे. त्याची रूंदी १२० मैल इतकी आहे. या ग्रहात लोखंडासह सोनं, प्लॅटिनम आणि निकेलही आहे. या क्षुद्रग्रहावरच्या धातूंची किंमत आठ हजार क्वॉड्रिलियन पाउंड इतकी आहे.



क्वॉड्रिलियन म्हणजे आठ हजारच्या पुढे १५ शून्य. ही रक्कम जगातल्या आठ अब्ज लोकांमध्ये वाटली तर प्रत्येकाच्या वाट्याला जवळपास ९५०० कोटी रुपये येतील. हा क्षुद्र ग्रह पृथ्वीपासून २४ अब्ज मैल लांब आहे. या ग्रहापर्यंत पोहोचण्यासाठी अंतराळ यानालाही चार वर्षं लागतील. नासा या क्षुद्रग्रहावर बरंच संशोधन करणार आहे. यासाठी विशेष मोहिमही राबवण्यात येणार आहे. २०२२ मध्ये या मोहिमेची सुरूवात होणार असल्याचं बोललं जात आहे. दरम्यान, एरिजोना स्टेट युनिव्हर्सिटीतल्या शास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार 'सायको १६' नामक या क्षुद्रग्रहचा शोध १८५२ मध्ये इटलीच्या एनीबेल डी गॅस्परिस या खगोलशास्त्रज्ञाने लावला होता. तसंच त्याला ग्रीक देवतेचं नावही देण्यात आलं होतं.